यांनी दिनांक १४-०३-२०११ रोजी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीच्या प्रती अपिलार्थीस पाठविल्या आहेत. अपिलार्थी यांना माहिती मिळाल्याची पोच त्यांना प्राप्त झाली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०६-०४-२०११ च्या व्दितीय अपिलामध्ये त्यांना माहिती मिळाली आहे तथापि ती अर्धवट मिळाली आहे असे मोघमपणे नमूद केले आहे. अपिलार्थीचा माहितीचा अर्ज विचारात घेता माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये लेखी स्वरुपात खुलासा, स्पष्टीकरण इत्यादी देय होत नाही. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे ही बाब त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मणियार श्रीरंग कस्तुरचंद, रा. स्वामी राघवेंद्र कॉलनी, डॉ. उमाकांत कुलकर्णी यांचे घर, जुना औसा रोड, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रा-तील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रा-तील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. प्रदिप नागनाथराव चौकटे, | : | अपिलार्थी |
| मु. पो. अंधोरी, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर | | |
| जन अपिलीय अधिकारी, | : | |
| अपर पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९६३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर - प्रतिनिधी - श्री. पी. एस. ईनामदार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष : श्री. माधव शिंदे | : | अनुपस्थित |
| ३.५ | त्रयस्थ पक्ष : श्री. रघुनाथ शेळके | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४-०२-२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०२-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १४-०३-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०४-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्याचप्रमाणे पोलीस अधीक्षक, लातूर यांनी दिनांक ०६-०९-२०११ च्या पत्रान्वये श्री गणेश उत्सवाच्या संदर्भात संबंधित अधिकारी व्यस्त

असल्यामुळे सुनावणीची पुढील तारीख देण्याची आयोगास विनंती केली आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात येऊन सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०६-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रदिप नागनाथराव चौकटे, मु. पो. अंधोरी, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. संदीपान चोथवे,<br>हत्ते चौक, लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१०४२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नगर रचनाकार, नगर परिषद, लातूर - श्री. सतिश शिवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-१२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०१-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७-०३-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०४-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १८-१२-२०१० च्या माहिती अर्जान्वये एकूण नऊ मुद्दयावर १९९० ते १९९३, २००१ ते २००३ अशा विविध कालावधीची संपूर्ण लातूर शहरातील बांधकामाबाबतची माहिती मागितली आहे. सदर अर्जातील मुद्दा क्रमांक ३, ४, ५ व ९ ची माहिती नगर रचना संदर्भातील आहे व ती अपिलार्थीस देण्यात आली असून अपिलार्थी यांनी दिनांक ०५-०९-२०११ रोजी पोच दिली आहे. त्याचप्रमाणे मुद्दा क्रमांक ६ व ८ ची माहिती जन माहिती

अधिकारी तथा कर अधीक्षक यांच्याकडे व मुद्दा क्रमांक ७ ची माहिती जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक यांच्याकडे उपलब्ध आहे. तसेच मुद्दा क्रमांक १ व २ ची माहिती ही मोघम स्वरुपाची असल्यामुळे देय होत नाही.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांच्या माहिती मूळ अर्जावरुन त्यांनी लातूर शहरातील बांधकामाबाबत एकूण नऊ मुद्दयाची फार मोठ्या प्रमाणावर माहिती मागितली आहे. त्यामध्ये सन १९९० ते १९९३ व सन २००१-२००३ मधील शहरातील खुल्या जागेच्या कर मागणी रजिस्टरची प्रत अशी विस्तृत माहिती मागितली आहे. सदरची माहिती एका महिन्यात संकलीत करणे शक्य नाही असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे व माहिती अधिकार अधिनियम मधील कलम ७ (९) नुसार अशा माहितीचा अर्ज रद्द ठरविता येतो कारण अपिलार्थी यांनी विस्तृत व मोठ्या कालावधीची माहिती मागितल्यामुळे ही माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ प्रमाणाबाहेर वळवावे लागणार आहे व ही बाब अपेक्षित नाही. केंद्रीय माहिती आयोगाने अशा माहिती अर्जावर विचार करता येणार नाही असे निर्णय प्रसंगी घेतलेले आहेत. वर नमूद केल्याप्रमाणे उर्वरीत मुद्दा क्रमांक ६,७ व ८ ची माहिती मालमत्ता व्यवस्थापक व कर अधीक्षक, नगर परिषद, लातूर यांना अपिलार्थीस विनामूल्य नोंदणीकृत टपालाने पाठवावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संदीपान चोथवे, हत्ते चौक, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रा-तील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा कर अधीक्षक, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रा-तील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रा-तील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. आर्य ओमप्रकाश चंद्रनाथ,<br>भूषण अपार्टमेंट, साळे गल्ली, लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>विशेष भूसंपादन अधिकारी, स्वर्णा प्रकल्प, लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/११११ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. आर्य ओमप्रकाश चंद्रनाथ | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अव्वल कारकून, कार्यालय विशेष भूसंपादन अधिकारी, स्वर्णा प्रकल्प, लातूर<br>- प्रतिनिधी - श्री. व्ही. एम. स्वामी, लिपिक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४-०८-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२-०९-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-१२-२०१०<br>फेरसादर दि. ३०-४-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक ०६-०७-२०१० च्या माहिती अर्जान्वये त्यांची जमीन खुलगापूर उच्च पातळी धरणाच्या बॅकवॉटरमध्ये (साठवण) जात आहे याबाबतची सन २००६ ते २०१० या कालावधीची माहिती मागितली आहे. दिनांक ०४-०८-२०१० रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची तसेच खुलगापूर-भातांगळी बॅरेजमध्ये अद्याप निवाडा झालेला नाही त्यामुळे जमिनीचा मोबदला काय असेल हे आताच सांगता येऊ शकत नाही असे व इतर प्रश्नांबाबत संपादक संस्था, कार्यकारी अभियंता, निम्न तेरणा विभाग क्रमांक २, लातूर यांचेशी संपर्क साधणे योग्य होईल असे अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर यांनी सुनावणी घेऊन दिनांक २२-०९-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, खुलगापूर भातांगळी बॅरेजेच्या भूसंपादना-विषयीची माहिती - शेतकरी, क्षेत्रफळ, प्रारुप निवड्याची स्थिती इत्यादी विषयीची माहिती सात दिवसाच्या आत अपिलार्थीस द्यावी. त्यानुसार जन माहिती अधिकारी दिनांक २८-०९-२०१० रोजी नोंदणीकृत टपालाने माहिती पाठविली आहे तथापि ती अपिलार्थीस मिळाली नाही असे दिसते.

अपिलार्थी यांच्या मूळ माहितीच्या अर्जावरुन त्यांनी मागितलेली माहिती प्रनार्थक स्वरुपात आहे ही बाब बरोबर आहे तथापि त्यामागील पार्श्वभूमी विचारात घेऊन अपिलार्थीस माहिती देणे आवश्यक होते असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस खालील माहिती अभिप्रेत आहे व त्याबाबतचे आयोगाचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

१. खुलगापूर उच्च पातळी बंधारा उंची सात मीटर असताना चार मीटर पाणी ठेवले आहे हा निर्णय कार्यकारी अभियंता, निम्न तेरणा प्रकल्प क्रमांक २, लातूर यांनी घेतल्याचे दिसून येत आहे. याबाबतची कार्यालयीन टिपणी / आदेश / निर्णयाची प्रत अपिलार्थीस देय होत आहे ती अपिलार्थीस कार्यकारी अभियंता, निम्न तेरणा प्रकल्प क्रमांक २, लातूर यांनी द्यावी.

२. बुडित जमिनीच्या शेतक-यांना देण्यात येणा-या मोबदल्याचा दराबाबतची माहिती आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीकडे उपलब्ध आहे. त्यास दिनांक ०७-०८-२०११ रोजी शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे त्याची प्रत अपिलार्थीस विनामूल्य देण्याची व्यवस्था करण्यात यावी.

३. नदीकाठच्या सर्व जमिनी बागायती आहेत काय ? या मुद्दयाबाबत अपिलार्थीस त्यांची स्वतःची जमीन बागायती किंवा जिरायती कोणती आहे त्याबाबतच्या निवाड्याची प्रत देय होत आहे ती देण्यात यावी.

४. खुलगापूर-भातांगळी के. टी. तलाव सात मीटर असताना त्यामध्ये ४ मीटर पाणी ठेवले आहे याबाबत घेतलेल्या निर्णयाची प्रत वर नमूद केल्याप्रमाणे कार्यकारी अभियंता, निम्न तेरणा प्रकल्प क्रमांक , लातूर यांनी द्यावी.

अपिलार्थी यांना माहिती विहित मुदतीत मिळाली नाही व त्यांच्या माहितीच्या अर्जावर गांभीर्याने विचार करण्यात आला नाही त्यामुळे जन माहिती अधिकारी व त्यांचे संबंधित कर्मचारी यांच्याविरुध्द आयोगाने कार्यवाही करावी अशी विनंती आयोगास केली आहे. याबाबत आयोगाचे असे मत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये मागितलेल्या पाच मुद्दयापैकी चार मुद्दे प्रश्नार्थक स्वरुपाचे आहे व एक मुद्दा माहितीवजा आहे त्यामुळे जन माहिती अधिकारी त्यांना नेमकी माहिती पुरवू शकले नाहीत असे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांनी आयोगाने वर घेतलेल्या निर्णयाप्रमाणे साकल्याने विचार करुन प्रथम अपिलामध्ये नेमकी कोणती माहिती देण्यात यावी याचा उल्लेख करणे आवश्यक होते तथापि त्यांनी असे केल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे दिनांक ०७-०८-२०११ एका मुद्दयाबाबतची माहिती शासनाकडून उपलब्ध झाली आहे. दोन

मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी देऊ शकत नाही ती कार्यकारी अभियंता, निम्न तेरणा प्रकल्प क्रमांक , लातूर यांच्याकडे उपलब्ध आहे. या सर्व बाबी विचारात घेता झालेल्या विलंबाबाबत कलम २० (१) नुसार कारवाई होणे आयोगास आवश्यक वाटत नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, कार्यालय विशेष भूसंपादन अधिकारी, स्वर्णा प्रकल्प, लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. कार्यकारी अभियंता, निम्न तेरणा प्रकल्प क्रमांक २, लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आर्य ओमप्रकाश चंद्रनाथ, भूषण अपार्टमेंट, साळे गल्ली, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, कार्यालय विशेष भूसंपादन अधिकारी, स्वर्णा प्रकल्प, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. कार्यकारी अभियंता, निम्न तेरणा प्रकल्प क्रमांक , लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अनंत गोविंदराव पारसेवार, : अपिलार्थी
गोविंदराज प्रिंर्टस, रेल्वेस्टेशनजवळ, उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३६६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०६-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २८-०२-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३१-०५-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २८-०२-२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक २८-०२-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनंत गोविंदराव पारसेवार, गोविंदराज प्रिंर्टस, रेल्वेस्टेशनजवळ, उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. निलेश अशोकराव हिप्पलगावकर, : अपिलार्थी
श्याम सोसायटी, रामनगर, देगलूर रोड, उदगीर,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१६०४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-०४-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०५-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०६-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०५-२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०५-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. निलेश अशोकराव हिप्पलगावकर, श्याम सोसायटी, रामनगर, देगलूर रोड, उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| सौ. विमल गणपत निला,<br>रा. कबनसांगवी, तालुका चाकूर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना, उदगीर, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण), जिल्हा परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/४७६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - सौ. विमल गणपत निला | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना, उदगीर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण), जिल्हा परिषद, लातूर<br>- प्रतिनिधी - श्री. ए. ए. शेख, कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८-१०-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-१२-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २४-०२-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांना कागदपत्रे आतापर्यंत उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण), जिल्हा परिषद, लातूर यांनी अपिलार्थी-च्या प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन दिनांक ३०-१२-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, तीन मुद्दयावर अपिलार्थीस पंधरा दिवसाच्या आत माहिती द्यावी. तथापि आजपावेतो जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण), जिल्हा परिषद, लातूर यांनी दिलेल्या निर्णयानुसार अपिलार्थीस एका महिन्याच्या आत विनामूल्य नोंदणीकृत टपालाने माहिती पाठवावी लागेल. त्याचप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी तथा बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक विकास सेवा योजना, उदगीर, जिल्हा लातूर यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा आयोगास कलम २० (१) च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्यामार्फत सादर करावा लागेल. संबंधित जन माहिती अधिकारी यांना ही नोटीस तामीली करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांची राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी तथा बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना, लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी. व ही बाब जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण), जिल्हा परिषद, लातूर यांना पहावी लागेल.

२. संबंधित जन माहिती अधिकारी तथा बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक विकास सेवा योजना, उदगीर, जिल्हा लातूर यांना रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. विमल गणपत निला, रा. कबनसांगवी, तालुका चाकूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी-संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बोधले गणेश शिवाजीराव, : अपिलार्थी
शिल्प निदेशक, आय. टी. आय. औसा, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/६२१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यालय अधीक्षक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,<br>प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद - श्री. एस. व्ही. वाघ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक संचालक (तां.), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४-११-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०३-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये त्यांच्या दिनांक १३-०७-२०१० च्या अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली आहे तथापि असे पत्र त्यांच्या कार्यालयात प्राप्त झालेले नाही त्यामुळे कार्यवाही करण्यात आलेली नाही असे अपिलार्थीस दिनांक ०३-१२-२०१० च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे ते अपिलार्थीस हि माहिती पुरवू शकले नाहीत. हि बाब दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे अपील या स्तरावर निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०९-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बोधले गणेश शिवाजीराव, शिल्प निदेशक, आय. टी. आय. औसा, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक (तां.), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत
भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बावगे उमाकांत विश्वनाथ,<br>रा. वंजारवाडी, पो. वायगांव, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, दवणहिप्परगा,<br>तालुका देवणी, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी,<br>जिल्हा लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/७६९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, दवणहिप्परगा,<br>तालुका देवणी, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी,<br>जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९-११-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०१-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०३-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०१-२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. यास्तव प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी, जिल्हा लातूर यांच्याकडे प्रकरण पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी, जिल्हा लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०१-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०७-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बावगे उमाकांत विश्वनाथ, रा. वंजारवाडी, पो. वायगांव, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, दवणहिप्परगा, तालुका देवणी, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. प्रदिप नागनाथ चौकटे,<br>नरसिंग किशनराव कोयाडे, शंकर महादेव मंगे,<br>रा. अंधोरी, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी संचालक, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. मुख्य कार्यालय, लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/७७९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. प्रदिप नागनाथ चौकटे, शंकर महादेव मंगे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी संचालक, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. मुख्य कार्यालय, लातूर<br>- प्रतिनिधी - ॲड श्री. ए. एस. देशपांडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११-११-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९-११-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-१२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०३-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी ॲड श्री. ए. एस. देशपांडे उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी सुनावणीसाठी पुढील तारीख मिळण्याची विनंती केली. त्यांची ही विनंती मान्य करण्यात येऊन सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०७-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रदिप नागनाथ चौकटे, नरसिंग किशनराव कोयाडे, शंकर महादेव मंगे, रा. अंधोरी, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. मुख्य कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. स्वामी गंगाधर बाबुराव,<br>मु. पो. चाकूर, विश्व शांती धाम मंदिर जवळ,<br>तालुका चाकूर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, चाकूर, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर,<br>जिल्हा लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८६६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. स्वामी गंगाधर बाबुराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, चाकूर, जिल्हा लातूर - श्री. ए. एस. लांडगे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, चाकूर, जिल्हा लातूर - श्री. एन. डी. राठोड | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष : श्री. मधुकर पाटील | : | अनुपस्थित |
| ३.५ | त्रयस्थ पक्ष : श्री. अमृत जाधव | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०२-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०३-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ मधुकर पाटील, अमृत जाधव व सुनंदा शिवराज हिप्पाळे यांच्या प्लॉटची माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी या दोघांनीही ही बाब विचारात घेतलेली दिसून येत नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ११ नुसार नैसर्गिक न्याय व पारदर्शकता राखण्याच्या दृष्टीने त्रयस्थांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यानंतर व्यापक जनहिताच्या कसोटीवर माहिती देणे योग्य ठरते किंवा कसे हि बाब विचारात घेऊन निर्णय पारीत करणे आवश्यक आहे.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतन प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिायिमातील कलम १९ (१) अ-वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे याकरिता या प्रकरणी आयोग गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०२-२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घ्यावी व वर नमूद केल्याप्रमाणे दोन्ही बाजूंचे व त्रयस्थांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार माहिती देण्याबाबतचा निर्णय पारीत करावा. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर, जिल्हा लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०२-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०७-०९-२०११**

-----------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. स्वामी गंगाधर बाबुराव, मु. पो. चाकूर, विश्व शांती धाम मंदिर जवळ, तालुका चाकूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. संजयभाऊ जयराम कांबळे,<br>ॲङ अंगद गायकवाड यांचे निवास, संत गोरोबा सोसायटी, नांदेड रोड, लातूर, तालुका जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, जिल्हा हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, जिल्हा हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, जिल्हा हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, जिल्हा हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११-१०-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०३-११-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३-११-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२-०१-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०४-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे

ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०७-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजयभाऊ जयराम कांबळे, ॲड अंगद गायकवाड यांचे निवास, संत गोरोबा सोसायटी, नांदेड रोड, लातूर, तालुका जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमत-नगर, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पवार दगडू पांडुरंग, : अपिलार्थी
मु. पो. माळहिप्परगा, तालुका जळकोट, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, माळहिप्परगाव,
तालुका जळकोट, जिल्हा लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी, पंचायत समिती, जळकोट, जिल्हा लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/११३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. पवार दगडू पांडुरंग | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, माळहिप्परगाव,<br>तालुका जळकोट, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी, पंचायत समिती, जळकोट, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८-०२-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०४-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी दिनांक १७-०१-२०११ च्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती मिळाली नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आलेली नाही. त्याचप्रमाणे प्रथम

अपिलावर सुनावणी घेतली किंवा कसे आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठी-च्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १८-०२-२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता आयोग गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जळकोट, जिल्हा लातूर यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करत आहे. यास्तव प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जळकोट, जिल्हा लातूर यांच्याकडे प्रकरण पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जळकोट, जिल्हा लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक १८-०२-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०७-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पवार दगडू पांडुरंग, मु. पो. माळहिप्परगा, तालुका जळकोट, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, माळहिप्परगाव, तालुका जळकोट, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, जळकोट, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जळकोट, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख लालासाहेब राजेसाहेब, नगर परिषद शाळा क्रमांक ३२, बरकत नगर, लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर विभाग, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा धर्मादाय उपायुक्त, धर्मादाय उपायुक्त कार्यालय, लातूर विभाग, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११५५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर विभाग, लातूर - प्रतिनिधी - निरीक्षक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा धर्मादाय उपायुक्त, धर्मादाय उपायुक्त कार्यालय, लातूर विभाग, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-१०-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-११-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२-१२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख लालासाहेब राजेसाहेब, नगर परिषद शाळा क्रमांक ३२, बरकत नगर, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा धर्मादाय उपायुक्त, धर्मादाय उपायुक्त कार्यालय, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. नाईक पंडित विठ्ठलराव,<br>व्दारा, आर. एल. महानवर, महाराष्ट्र हौसिंग सोसायटी, बार्शी रोड, लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, साने गुरुजी प्राथमिक आश्रमशाळा, काटगांव तांडा, तालुका जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३१६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, साने गुरुजी प्राथमिक आश्रमशाळा, काटगांव तांडा, तालुका जिल्हा लातूर - श्री. चव्हाण शेषराव धावजी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>समाजकल्याण अधिकारी-२, विशेष जिल्हा समाजकल्याण कार्यालय, लातूर - श्री. आर. एम. शिंदे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७-०३-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २८-०४-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०५-२०११<br>फेरसादर दिनांक<br>२२-०६-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १७-०३-२०११ च्या माहिती अर्जान्वये त्यांच्या शाळेच्या संदर्भात हजेरीपट, शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यतेचे आदेश, गुणपत्रक, सनद, टी. सी. इत्यादीबाबत माहिती मागितली आहे. सदरचा माहिती अर्ज त्यांच्या कार्यालयात दिनांक २६-०३-२०११ रोजी प्राप्त झाला त्यानंतर लगेच दिनांक ०७-०४-२०११ रोजी माहितीकरिता रुपये १५६ चा भरणा करावा असे अपिलार्थीस कळविले तथापि अपिलार्थीने त्यावर प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती हस्तगत करणार होते.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक २८-०४-२०११ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस माहिती द्यावी असा निर्णय दिला त्याचे कारण असे की, अपिलार्थी यांनी ४८ तासाच्या आत माहिती मागितली होती. जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी-२, विशेष जिल्हा समाजकल्याण कार्यालय, लातूर यांनी अपिलार्थीस दिनांक २८-०४-२०११ रोजी व्यक्तिशः माहिती दिली त्याबाबतची अपिलार्थीची पोच त्यांच्याकडे आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, अपिलार्थी त्यांच्या कार्यालयाकडे वारंवार माहितीचे अर्ज करतात. आज रोजी अपिलार्थी यांचे त्यांच्याकडे सहा अर्ज व जन माहिती अधिकारी यांच्याकडे आठ अर्ज आहेत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहितीच्या अर्जामध्ये ४८ तासाच्या आत माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) प्रमाणे ही बाब अयोग्य आहे याची नोंद अपिलार्थी तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत अपिलार्थीस शुल्काचा भरणा करावा असे कळवूनही विनामूल्य माहिती देण्याचे आदेश दिले आहेत ही बाब देखील योग्य नाही याची नोंद सर्वांनी घेणे आवश्यक आहे दिनांक २८-०४-२०११ रोजी अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०७-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नाईक पंडित विठ्ठलराव, व्दारा, आर. एल. महानवर, महाराष्ट्र हौसिंग सोसायटी, बार्शी रोड, लातूर.

२.	जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, साने गुरुजी प्राथमिक आश्रमशाळा, काटगांव तांडा, तालुका जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाही-साठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी-२, विशेष जिल्हा समाज-कल्याण कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भास्कर नारायणराव लहाने, : अपिलार्थी
मु. पो. भाग्यनगर, नांदेड रोड, अहमदपूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद, अहमदपूर, जिल्हा लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, अहमदपूर, जिल्हा लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. भास्कर नारायणराव लहाने | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यालय अधीक्षक, नगर परिषद, अहमदपूर, जिल्हा लातूर - श्री. बिलापट्टे एस. जी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, अहमदपूर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०२-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६-०३-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२-०४-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०५-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांना सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी प्रस्तावित प्रारुप विकास योजना आराखड्यासंदर्भात आरक्षित भूखंडाबाबत मालमत्ता कर विभागाने केलेल्या

नोंदीबाबतच्या संचिकेच्या कागदपत्राच्या छायांकीत प्रती मागितल्या आहेत. असे ९४ सेलडिड आहेत व हि सर्व माहिती त्रयस्थाच्या संबंधात आहे

या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतलेली आयोगास आढळून येत नाही.याकरिता प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे आवश्यक आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली बहुतांश माहिती त्रयस्थाच्या संबंधात आहे याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ नुसार त्रयस्थांना त्यांची बाजू मांडण्याची संधी द्यावी लागेल हि बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकता राखण्याच्या दृष्टीने जरुरी आहे व तदनंतर व्यापक जनहिताच्या कसोटीवर माहिती देणे योग्य ठरते किंवा कसे ही बाब विचारात घेऊन निर्णय पारीत करणे आवश्यक आहे.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०२-०४-२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, अहमदपूर, जिल्हा लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, अहमदपूर, जिल्हा लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०२-०४-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भास्कर नारायणराव लहाने, मु. पो. भाग्यनगर, नांदेड रोड, अहमदपूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, नगर परिषद, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अनंत गोविंदराव पारसेवार, : अपिलार्थी
रा. उदगीर, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका पुरवठा अधिकारी,
तहसील कार्यालय, उदगीर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
तहसील कार्यालय, उदगीर, जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/४५५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,उदगीर, जि.लातूर - श्री.क्षीरसागर व्ही.व्ही. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, उदगीर,जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उदगीर, जि.लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.१५.११.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये उदगीर तहसील कार्यालयासंदर्भात बोगस शिधापत्रिका धारकांच्या नावाबाबत तसेच दि. ०३.१०.२०१० रोजी दै. लोकमतमध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीच्या संदर्भात चौकशी व कार्यवाहीच्या अहवालाची माहिती मागितली आहे. ही माहिती (एकूण ४६ पृष्ठे) संकलीत करुन अपिलार्थीस दि. ०३.०८.२०११ रोजी देण्यात आली आहे. अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाली असून त्याची पोच त्यांच्या दप्तरी दाखल आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थीस दि. ०३.०८.२०११ रोजी माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

या सर्व बाबी पाहता विचाराधीन प्रकरण निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. तथापि तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याकडून या माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब झालेला दिसून येत आहे. भविष्यात असा विलंब होणार नाही, यासाठी दक्ष राहण्याबाबत जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, उदगीर यांनी त्यांच्या स्तरावर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना सूचना द्यावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, उदगीर, जि.लातूर यांनी संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना भविष्यात त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक माहितीसाठीच्या अर्जावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही होईल, याची दक्षता घेण्याच्या सूचना द्याव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनंत गोविंदराव पारसेवार,गोविंदराज प्रिंटर्स, रेल्वेस्टेशनजवळ, उदगीर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संजय तुकाराम पवार,<br>रा.हाडळती, ता. अहमदपूर,<br>जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, अहमदपूर, जि. लातूर<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जि.लातूर | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/६०७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अहमदपूर, जि. लातूर- श्री.कांबळे के.एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, अहमदपूर, जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष- श्री. एस.डी. मलशेटे,स्वस्तधान्य दुकानमालक,हाडळती | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६.०८.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,अहमदपूर, जि.लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.२६.०७.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये स्वस्तधान्य दुकानमालक, श्री. एच.डी.मलशेटे यांच्याकडील सन २०१० या कालावधीतील केरोसीन व अन्नधान्य वितरणाबाबत विस्तृत माहिती मागितली आहे. ही माहिती संकलीत करुन पुरवण्यासाठी त्रयस्थ - स्वस्तधान्य दुकानदार यांना दि. ३१.०७.२०१० रोजी कळविण्यात आले आहे. त्यानुसार स्वस्तधान्य दुकानदार यांनी एकूण २०८११ पृष्ठांकरिता ₹४१६२२/- इतका निधी लागेल, असे जन माहिती अधिकारी यांना दि. ०५.०८.२०१० रोजी कळविले आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी,लातूर यांच्याकडे दि. १६.०८.२०१० रोजीच्या पत्राद्वारे निधीची मागणी केली आहे व निधी प्राप्त होताच आपणास देण्यात येईल, असे अपिलार्थीस कळविले आहे. तसेच माहिती पाहणीसाठी उपलब्ध करुन देण्यात येईल, असेही कळविले आहे. त्यानंतर माहिती गहाळ झाली असे त्रयस्थ स्वस्तधान्य दुकानदार यांनी दि. १८.०९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांना कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन माहिती गहाळ झाल्यामुळे सद्यस्थितीत देणे शक्य नाही व उपलब्ध होताच अपिलार्थीस देण्यात यावी, असे निर्णयामध्ये नमूद केले आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन वरील बाबी दिसून येत आहेत. यावरुन असे दिसून येत आहे की, त्रयस्थ दुकानदार यांच्याकडे प्रथम माहिती उपलब्ध होती व त्यानंतर ती माहिती गहाळ झाली आहे, असे कळविले आहे. तरी या संपूर्ण प्रकरणाची जिल्हा पुरवठा अधिकारी, लातूर यांनी चौकशी करणे आवश्यक ठरत आहे व चौकशीमध्ये जे निष्कर्ष आढळतील, त्याप्रमाणे उचित कार्यवाही योजावी लागेल.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांना अद्याप काहीही माहिती मिळाली नाही. या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित उपलब्ध असलेले सर्व अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे

सूचित करावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

२) जिल्हा पुरवठा अधिकारी, लातूर यांनी या प्रकरणी वर नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे गहाळ झाल्यासंदर्भात संपूर्ण चौकशी करुन दोषी आढळल्यास दोषींविरुध्द उचित कार्यवाही करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय तुकाराम पवार, मु.पो. हाडोळती, ता.अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, अहमदपूर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हा पुरवठा अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दशरथ आच्युतराव होळे, : अपिलार्थी
रा.आष्टामोड,ता.चाकूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८१७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय,लातूर - श्री. जी. मं.घोरपडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,लातूर - डॉ. तु.सं.मोटे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ११.०२.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०३.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.

१९.११.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये जी माहिती मागितली आहे तीच माहिती त्यांच्या विभागातील वरिष्ठ कार्यालयाकडे दि. १९.११.२०१० रोजी मागितली आहे व त्यावर आयोगाच्या या खंडपीठापुढे दि. ०६.०९.२०११ रोजी सुनावणी झाली आहे. त्यामध्ये पुन्हा सुनावणी घेण्याची आवश्यकता नसावी, अशी आयोगास विनंती केली. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन ही बाब दिसून येत आहे. अपिलार्थी यांचे द्वितीय अपील क्र. ८१६/११ सुनावणी दि. ०६.०९.२०११ या प्रकरणातील दि. १९.११.२०१० रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व आज रोजी विचाराधीन असलेला दि. १९.११.२०१० रोजीचा माहितीचा अर्ज एकसारखाच आहे. त्यामुळे सदरचे द्वितीय अपील निष्प्रभ होत आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात नव्याने सुनावणी घेण्याची आवश्यकता आयोगास वाटत नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०७-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दशरथ आच्युतराव होळे, रा.आष्टामोड, पो.गांजूर, ता.चाकूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी,<br>रा.टेंभुर्णी, ता.अहमदपूर, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय,अहमदपूर,जि.लातूर<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जि.लातूर | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८४४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार(पुरवठा), तहसील कार्यालय,अहमदपूर, जि.लातूर- श्री. कांबळे के.एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, अहमदपूर, जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०२.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २८.०२.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०३.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी आयोजित केली होती त्यावेळी जन माहिती

अधिकारी तथा नायब तहसीलदार (पु) व अपिलार्थी गैरहजर असल्यामुळे सदरील अपील निकाली काढले आहे. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

याकरिता या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०३.०२.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अहमदपूर, जि.लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अहमदपूर, जि.लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.०३.०२.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी एक संधी देण्यात यावी अथवा अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित राहिल्यास वस्तुनिष्ठ, गुणवत्तेवर आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०७-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, रा.टेंभुर्णी, ता.अहमदपूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार(पुरवठा), तहसील कार्यालय,अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुरेश व्यंकटराव बुलबुले, रा.लातूर : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नगररचनाकार, नगर परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९२७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०७-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुरेश व्यंकटराव बुलबुले | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नगर रचनाकार, नगर परिषद, लातूर - श्री. सतीश कृष्णराव शिवणे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.०३.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२.०४.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. २ ची एफएसआयबाबतची माहिती मिळाली आहे. मुद्दा क्र. १ मध्ये त्यांनी दोन त्रयस्थ व्यक्ती श्री. ईटकर यांचे बांधकाम व त्या बांधकामास लागून असलेल्या बहुमजली (ट्वेन्टी वन प्रॉपर्टीज प्रायव्हेट लि.) इमारतीच्या बांधकामासंबंधी - बांधकाम परवाना व चटई क्षेत्राची प्रत मागितली आहे. ती माहिती त्यांना प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी दि.

२०.१२.२०१० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस ईमारत धारकाचे नाव, सालसन,दिनांक दिलेस ती माहिती या विभागाच्या अभिलेखात उपलब्ध असलेस ती आपणास देणे शक्य होईल, असे कळविले आहे. त्यानुसार अपिलार्थीने एका महिन्यात अशी माहिती दिल्यास जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस पुढील तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी, असे आयोगाचे निर्देश आहेत.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुरेश व्यंकटराव बुलबुले, २३/७२, कापडलाईन, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मणियार श्रीरंग कस्तुरचंद, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नगररचनाकार,
नगर परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९४६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०७-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -नगर रचनाकार, नगर परिषद, लातूर - श्री. सतीश कृष्णराव शिवणे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.०३.२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २१.०२.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.०३.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६.०४.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.१२.०१.२०११ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये त्रयस्थ सौ.

दिपा धनशेट्टी यांचे अनधिकृत बांधकामावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली आहे. सदरच्या कामाबाबतची संचिका कार्यालयात उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस दि. १४.०३.२०१० रोजी कळविले आहे. त्याची पोच जन माहिती अधिकारी यांच्या दप्तरी उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे सध्याच्या जन माहिती अधिकारी यांनी या संचिकेचा शोध पुन्हा घेतला तरी संचिका उपलब्ध झाली नाही व ही बाब पुन्हा दि. २९.०८.२०११ रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे कळविली आहे. हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले आहे. त्यासंदर्भातील अपिलार्थीची पोच त्यांच्या दप्तरी उपलब्ध आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर या स्तरावर अपील प्रकरण बंद करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मणियार श्रीरंग कस्तुरचंद, रा. स्वामी राघवेंद्र कॉलनी, डॉ. उमाकांत कुलकर्णी यांचे घर, जुना औसा रोड, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. श्रीपती गणपती बटनपुरे, : अपिलार्थी
मु.पो.लातूर रोड, ता.चाकूर,जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप अधीक्षक, भूमी अभिलेख,
चाकूर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९५५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. श्रीपती गणपती बटनपुरे | : | उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे वकिल-ॲड.एम. बी. पाटणी | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी -उपअधिक्षक,भूमी अभिलेख, चाकूर, जि.लातूर - श्री. सर्जे डी.व्ही. | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, लातूर - प्रतिनिधी- श्री.एल. ए.झुंजारे, शिरस्तेदार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | प्रत जोडलेली नाही |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | प्रत जोडलेली नाही |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०४.२०११ (फेरसादर दि.३०.०७.२०११) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,त्यांचे वकील,जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन आयोगाच्या नजरेस आले आहे की, अपिलार्थी यांनी त्यांचे द्वितीय अपील सादर करताना प्रपत्र अ व ब ची प्रत जोडलेली नाही. त्यामुळे मूळ माहितीसाठीचा अर्ज सादर केला नसल्यामुळे पुढील कार्यवाही करणे शक्य होत नाही. तथापि अपिलार्थीस एक संधी देण्याकरिता आयोग द्वितीय अपील दाखल करुन घेत आहे व सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्या वेळी माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार परिपूर्ण कागदपत्रे आयोगास सादर करावी लागतील. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, लातूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर घेतलेल्या निर्णयाची प्रत सुध्दा आयोगाच्या निर्देशानुसार अपिलार्थी यांच्या वकिलांना त्वरित संदर्भासाठी देण्यात आली.

पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीपती गणपती बटनापुरे, मु.पो. लातूर रोड, ता.चाकूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक, भूमी अभिलेख,चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. प्रदिप नागनाथ चौकटे,श्री. शंकर महादेव मंगे,<br>रा.अंधोरी, ता.अहमदपूर,जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल),<br>तहसील कार्यालय,अहमदपूर,जि.लातूर<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, अहमदपूर, जि.लातूर | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१००५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.प्रदिप नागनाथ चौकटे,श्री. शंकर महादेव मंगे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, अहमदपूर, जि.लातूर - प्रतिनिधी - श्री.- कांबळे के.एस.,ना.त.(पु.) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, अहमदपूर, जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०७.०२.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०४.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. याची आयोग गंभीर दखल घेत असून प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे.पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रदिप नागनाथ चौकटे, श्री. शंकर महादेव मंगे, मु.पो. अंधोरी, ता.अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संदीपान चोथवे,रा.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, लातूर.<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, लातूर | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१०३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नगर रचनाकार, नगर परिषद, लातूर - श्री. सतीश शिवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०२.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७.०३.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०४.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार, नगर परिषद, लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.०४.०१.२०११ रोजीच्या

माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये नगर परिषदेच्या मालकी हक्काची जागा सार्वजनिक कार्यक्रम, सभेसाठी वापराबद्दल एकूण ०६ मुद्यांवर माहिती मागितली आहे. या ६ मुद्यांची माहिती तीन शाखेकडे उपलब्ध असते. ती संकलीत करुन एकत्रित करण्यास काही कालावधी लागला. अपिलार्थीस मुद्दा क्र. १,२,३,५ व ६ संदर्भातील माहिती जी नगर रचना विभागाशी संबंधित आहे, ती दि. ०५.०९.२०११ रोजी व्यक्तिशः देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील माहिती कर अधीक्षक, नगर परिषद, लातूर यांनी अपिलार्थीस दि. ०७.०३.२०११ रोजी पोस्टाने पाठविली आहे. यासंदर्भातील अपिलार्थीची दि. ०८.०३.२०११ रोजीची पोच जन माहिती अधिकारी यांच्या दप्तरी उपलब्ध आहे. मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती मालमत्ता व्यवस्थापक यांच्याशी संबंधित आहे. त्यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांच्याकडे सादर केली आहे. ती देण्याचे बाकी आहे.

या सर्व बाबी पाहता उपलब्ध कागदपत्रे व युक्तिवादावरुन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ ची माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ ची माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०७-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संदीपान चोथवे, हत्ते चौक, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गणेश शिवलिंग कटके, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नगर रचनाकार,
नगर परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गणेश शिवलिंग कटके | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नगर रचनाकार,नगर परिषद, लातूर - श्री. सतीश शिवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०२.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०३.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५.०४.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०५.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर परिषद, लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.१४.०२.२०११ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये वीरशैव कक्कय्या सहकारी सहभागीदारी भाडेकरी मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था,बार्शी रोड,लातूरच्या संदर्भात केलेल्या तक्रार अर्जाच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीच्या माहितीची सत्यप्रत मागितली आहे. या प्रकरणाच्या संदर्भात संस्थेला दिलेल्या भूखंडापैकी जी जागा मोकळी ठेवावयाची असते, त्या जागेसंदर्भात नियमबाहय ठराव घेऊन मोकळया जागेचा गैरवापर केला आहे. त्यासंदर्भात नगर परिषदेने केलेल्या चौकशीच्या अहवालाची प्रत मागितली आहे. अपिलार्थी यांनी दि. २३.०३.२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांनी दि. १३.०४.२०११ रोजी निर्णय दिला आहे की, दहा दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. यावर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. ०३.०५.२०११ रोजी यासंदर्भात काही कागदपत्रे अपिलार्थीस पाठविली आहेत.सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांना ही कागदपत्रे प्राप्त झाली आहेत व त्यामध्ये त्रयस्थांना दिलेल्या नोटीसची प्रत व सहायक निबंधक सहकारी संस्था, लातूर यांनी दिलेल्या अहवालाची प्रत दिली आहे. तथापि अपिलार्थी यांना नगर परिषदेने त्यांच्या तक्रार अर्जावर अवैध बांधकामाच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अभिप्रेत आहे, ती प्राप्त झाली नाही, असे सांगितले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन वरील बाबी दिसून येत आहेत. अपिलार्थीस त्यांच्या तक्रार अर्जावर नगर परिषद कार्यालयाने त्रयस्थ श्री. शेळके यांच्या सोसायटी भूखंडावर केलेल्या अवैध बांधकामाबाबत केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल अभिप्रेत आहे. ही माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार देय होत आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांना या अहवालाच्या प्रतीचा शोध घेऊन संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना लेखी विचारणा करुन प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अहवालाची माहिती प्राप्त करुन घेऊन हे आदेश प्राप्त होताच दोन महिन्याच्या आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०७-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणेश शिवलिंग कटके,मु. विरशैव कक्कया सहकारी सहभागीदारी भाडेकरु मागासवर्गीय गृह निर्माण संस्था, बार्शी रोड, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार,नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बोमनाळे कोंडिबा वैजनाथ,<br>रा.उदगीर, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>वेतन पथक अधीक्षक,<br>प्राथमिक विभाग, जिल्हा परिषद, लातूर<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्रा.),<br>जिल्हा परिषद, लातूर | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बोमनाळे कोंडिबा वैजनाथ | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अधीक्षक, वेतन व भ.नि.नि.पथक, जिल्हा परिषद, लातूर-श्री. प्रवीण गायकवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - डॉ.झाकीर हुसेन ऊर्दू व मराठी समांतर प्राथमिक शाळा, लातूर- श्री. कादरी के.एस.मुख्याध्यापक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०१.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी,जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे डॉ.झाकीर हुसेन ऊर्दू व मराठी समांतर प्राथमिक शाळा, लातूर या शाळेतील जून, २००८ ते दि. ०२.११.२०१० पर्यंतच्या वेतनबीलाच्या सत्यप्रतीच्या तसेच ॲडव्हाईससह साक्षांकित प्रती अशी माहिती मागितली आहे. सदर माहिती आजपर्यंत देण्यात आली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांनी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडून संदर्भित बीलाच्या साक्षांकित प्रती आज सोबत आणल्या असून दोन संचामध्ये (पृष्ठे ७०+२७) अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्याकडे उपलब्ध आहेत. आयोगाच्या सूचनेनुसार सुनावणीच्या वेळी दोनही संच अपिलार्थीस देण्यात आले. तथापि संदर्भित ॲडव्हाईसच्या प्रती मुख्याध्यापक यांच्याकडे असत नाहीत, असे मुख्याध्यापक, डॉ.झाकीर हुसेन ऊर्दू प्राथमिक शाळा, लातूर यांनी आयोगास अवगत केले. याकरिता ही माहिती जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील अभिलेखातून शोधून विनामूल्य द्यावी लागेल. ही माहिती देण्यास विलंब झालेला आहे. याकरिता आयोगातर्फे जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, वेतन व भ.नि.नि.पथक, लातूर यांना भविष्यात त्यांच्याकडे अधिनियमाद्वारे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक माहिती अर्जास विहित मुदतीत कार्यवाही करण्यासाठी दक्ष राहावे लागेल, असे सूचित करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, लातूर यांनी वर निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे उर्वरित माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०९-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बोमनाळे कोंडिबा वैजनाथ, रा.दूध डेअरीसमोर,उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, वेतन व भ.नि.नि.पथक, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.),जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. महाजन भिमाशंकर शिवरुद्रप्पा, : अपिलार्थी
रा.वलांडी, ता.देवणी, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
मुख्याध्यापक,
राष्ट्रीय विद्यालय,टाकळी,ता.देवणी,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (मा.),
जिल्हा परिषद, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/४५७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०८-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. महाजन भिमाशंकर शिवरुद्रप्पा | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. एन.जे.सौदागर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.०९.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ११.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.०१.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी त्रयस्थ पक्ष,जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांनी दि.२३.०८.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुख्याध्यापक, राष्ट्रीय विद्यालय, टाकळी श्री. एन.जे. सौदागर या त्रयस्थ व्यक्तींच्या सेवापुस्तिकेची साक्षांकित प्रत मागितली आहे. ती त्यांना आजपर्यंत प्राप्त झाली नाही. ती देण्यात यावी.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी त्यांच्या स्वत:ची सेवापुस्तिका त्यांच्याजवळ नाही, अशी भूमिका घेतली आहे. याची नोंद जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा) यांनी सुनावणीच्या वेळी घेऊन दि. १०.०१.२०११ रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थीच्या दि २३.०८.२०१० रोजीच्या अर्जातील मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा एकत्र करुन सात दिवसांच्या आत अपिलार्थीस देण्यात यावी. आयोगास असे दिसून येत आहे की, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी दि. २४.०९.२०१० रोजी अपिलार्थीस कळविले आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ते संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष होते व दि. १६.०१.२००४ रोजी शाळेतील रेकॉर्ड घेऊन गेले त्यामध्ये सदरची सेवापुस्तिका आहे. ते रेकॉर्ड घेऊन गेले असल्यामुळे माहिती देता येत नाही. या सर्व पार्श्वभूमीवर मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.लातूर यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.लातूर यांच्यामार्फत या प्रकरणी चौकशी करावी व रेकॉर्ड कोठे आहे याचा शोध घेऊन रेकॉर्ड उपलब्ध झाल्यास जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत माहिती देण्यात येईल, असे पहावे. सेवापुस्तिकेची माहिती देताना कलम १० नुसार व्यक्तिगत व खाजगी नोंदी वगळून ज्या नोंदी शासकीय कामकाजाअंतर्गत तयार झालेल्या आहेत, अशी माहिती देण्यात येईल. अशी संपूर्ण कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तीन महिन्यात संपुष्टात आणावी, असे आयोगाचे निर्देश आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे हे आदेश प्राप्त होताच तीन महिन्याचे आत कार्यवाही पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महाजन भिमाशंकर शिवरुद्रप्पा,रा.वलांडी, ता.देवणी, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,राष्ट्रीय विद्यालय,टाकळी,ता.देवणी,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.),जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जाधव वसंत किशनराव, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद, लातूर.
जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद, लातूर.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/५५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जाधव वसंत किशनराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, श्री गणेश प्राथमिक विद्यालय, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्रा),जि.प.लातूर - प्रतिनिधी - श्री. प्रवीण गायकवाड, अधीक्षक, वेतन व भ.नि.नि.पथक,जि.प.लातूर. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३०.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०६.११.२००७ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६.०२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०५.२००८ (फेरसादर,दि.०१.०३.२०११) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांनी दि.३०.१०.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये ज्ञानदिप शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित श्री गणेश प्राथमिक विद्यालय,लातूर यांच्या सन १९९५ ते २००६-०७ पर्यंतच्या वेतनेतर अनुदानाचा तपशील अशी माहिती मागितली आहे. त्यापैकी त्यांना सन १९९८ ते २००२ ची माहिती प्राप्त झाली आहे. उर्वरित माहिती मिळालेली नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती मुख्याध्यापक,श्री गणेश प्राथमिक विद्यालय,लातूर यांच्याकडे उपलब्ध असल्याने माहितीसाठीचा मूळ अर्ज दि. ०६.११.२००७ रोजी त्यांच्याकडे वर्ग करण्यात आला. त्याचप्रमाणे सन २००२ च्यानंतर शासनाकडून वेतनेतर अनुदान कोणत्याही शाळेस मंजूर करण्यात आलेले नाही. त्यामुळे सदरची माहिती निरंक आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी मूळात दि. ०६.०५.२००८ रोजी द्वितीय अपील सादर केले आहे व हे द्वितीय अपील सादर करताना त्यामध्ये आढळलेल्या त्रूटींची पूर्तता करण्यासाठी त्यांना दि. २९.११.२००८ रोजी कळविण्यात आले होते. दि. ०१.०३.२०११ रोजी अपिलार्थी यांनी सदरचे द्वितीय अपील फेरसादर केले. त्यावर आज सुनावणी घेण्यात येत आहे. अपिलार्थीचा अर्ज जुना आहे. त्यांना वर नमूद केल्याप्रमाणे सन १९९८ ते २००२ ची माहिती मिळाली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर विचाराधीन अपील बंद करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. अपिलार्थीस आणखी काही माहिती आवश्यक वाटल्यास ते स्वतंत्र अर्ज करु शकतात.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जाधव वसंत किशनराव,विवेकानंद पुरण परिमल शाळेच्या पूर्वेस जुनी सुतगिरणी रोड, लातूर, ता.जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, गणेश प्राथमिक विद्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा),जि.प.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विजयकुमार गुरनाथ पवार, : अपिलार्थी
रा.सोमनाथपूर,ता.उदगीर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, सोमनाथपूर,ता.उदगीर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,उदगीर, जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/६५३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विजयकुमार गुरनाथ पवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, सोमनाथपूर,ता.उदगीर, जि.लातूर - श्री. राठोड सीताराम हरीलाल | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, उदगीर, जि.लातूर - श्री. केंद्रे उत्तम मारुतीराव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७.०२.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०३.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, सोमनाथपूर,ता.उदगीर, जि.लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.०७.०१.२०११ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये सन २००८ ते १० या कालावधीत त्यांच्या ग्रामपंचायत विविध विकास कामाबाबतची व इतर कामाबाबतची विस्तृत अशी माहिती एकूण ८ मुद्यांद्वारे मागितली आहे. माहितीची व्याप्ती विचारात घेता सदराची माहिती उपलब्ध असून माहितीची पाहणी करण्याकरिता दि.१५.०२.२०११ अशी तारीख निश्चित केल्याचे दि. ०५.०२.२०११ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले होते. अपिलार्थी अशी पाहणी करण्याकरिता उपस्थित झाले नाहीत. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी(पं),पंचायत समिती,उदगीर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. त्यावेळी असा निर्णय घेण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना सदरची माहिती पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावी. त्याप्रमाणे अपिलार्थीस दि. ०४.०३.२०११ रोजीच्या पत्राद्वारे दि.०८.०३.२०११ रोजी पाहणीची तारीख निश्चित केल्याचे कळविलेले आहे. तथापि अशी पाहणी झ ाली नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी ते आता माहितीची पाहणी करण्याकरिता तयार आहेत, असे त्यांच्या युक्तिवादामध्ये प्रतिपादन केले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती विचारात घेता यासाठी जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) व २(ञ) (एक) मधील तरतुदी विचारात घेऊन दोन दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी दोन दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विजयकुमार गुरनाथ पवार,रा.सोमनाथपूर,ता.उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, सोमनाथपूर,ता.उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गुणाले अनिल सुर्यकांत, : अपिलार्थी
श्री. शेटकार विवेकानंद बाबुराव,
श्री.बंडे बलभीम माधवराव, रा.गुडसूर,
ता.उदगीर, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
(१) मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद कन्या प्रा.शाळा,गुडसूर, ता.उदगीर,जि.लातूर
(२)मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद प्रशाला,गुडसूर, ता.उदगीर,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, उदगीर, जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८२३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेटकर विवेकानंद बाबुराव, श्री.बंडे बलभीम माधवराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक,जिल्हा परिषद प्रशाला,गुडसूर, ता.उदगीर,जि.लातूर-श्री. मद्देवाड व्ही.आर. | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक,जिल्हा परिषद कन्या प्रा.शाळा,गुडसूर, ता.उदगीर,जि.लातूर - श्री. गुडसूरकर एम.एन. | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, उदगीर, जि.लातूर- प्रतिनिधी - श्री. बिरादार के.पी.,गट समन्वयक | : | उपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०९.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २०.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | २४.०१.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २५.०३.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. अपिलार्थी यांनी दि. ०९.१०.२०१० रोजीच्या मूळ अर्जानुसार मुख्याध्यापक,जिल्हा परिषद, प्रा.कन्या, गुडसूर यांच्याकडून ग्राम शिक्षण समितीचा माहे मार्च,२०१० ते ऑक्टोबर, १०.१०.२०१० पर्यंतचा अहवाल, खोली बांधकाम प्रस्तावाच्या संपूर्ण कागदपत्रांची प्रत अशी माहिती दोन मुद्यांद्वारे मागितली आहे, असे दिसून येत आहे. सदरची माहिती संकलीत करुन दि. २१.०३.२०११ रोजी त्याचप्रमाणे अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणीच्या वेळी अशी दोन वेळा अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी त्यांना माहिती मिळाली आहे, ही बाब मान्य केली. तथापि त्यांना एकूण २७ दिवस उशिराने माहिती मिळाली आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी हे शिक्षक असून सध्या मुख्याध्यापकाचा पदभार सांभाळत आहेत व त्यांच्याकडील कामकाज पाहता स्वतःचे कामकाज सांभाळून अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे. या विलंबास हे कारण पुरेसे आहे. यामुळे शास्तीसंदर्भात विचार करणे शक्य नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गुणाले अनिल सुर्यकांत,श्री. शेटकर विवेकानंद बाबुराव,श्री.बंडे बलभीम माधवराव, रा.गुडसूर,ता.उदगीर, जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक जिल्हा परिषद,प्रशाला,गुडसूर, ता.उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,जिल्हा परिषद कन्या प्रा.शाळा,गुडसूर, ता.उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आयनाले पद्माकर रामराव, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक,
लालबहादुर शास्त्री प्राथमिक विद्यालय,लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९९० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. आयनाले पद्माकर रामराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक,लालबहादुर शास्त्री प्राथमिक विद्यालय,लातूर - प्रतिनिधी - श्री. माने किशोर गोविंदराव,प्राथमिक पदवीधर शिक्षक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर - प्रतिनिधी- श्री. प्रवीण गायकवाड,अधीक्षक, जि.प.लातूर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०४.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. अपिलार्थी यांना माहिती मिळाली नाही, असे त्यांनी युक्तिवादात सांगितले. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने माहिती पाठविली आहे, असे आयोगासमोर प्रतिपादन केले.

अपिलार्थी यांचा माहितीसाठीचा अर्ज पाहता, सन १९९७ पासूनची विविध मुद्यांवर व्यापक माहिती अपिलार्थी यांनी मागितल्याचे दिसून येत आहे. या माहितीमध्ये सन १९९७ पासून दि.१३.१२.२०१० पर्यंतचे शाळेतील विद्यार्थी प्रवेश व इतर तपशील तसेच शिक्षक नेमणूकीसंदर्भातील विस्तृत तपशील इ. माहिती मागितली आहे. अशाप्रकारे माहिती मागण्याने माहिती अधिकार अधिनियमाच्या मागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. माहितीसाठीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील साधनसामग्री व मनुष्यबळ यांचा मोठया प्रमाणावर वापर करावा लागणार आहे. यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७(९) नुसार असे माहितीचे अर्ज निष्प्रभ ठरत असल्यामुळे केंद्रीय माहिती आयोगाने अशा माहिती अर्जांवर विचार करण्यात येऊ नये, असे निर्णय घेतले आहेत. याकरिता अपिलार्थीने त्यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती स्वेच्छेने कमी करण्याचे आयोगाने सुनावणीमध्ये अपिलार्थीस सूचित केले. अपिलार्थीने ही बाब मान्य करुन त्यांना खालील माहिती अपेक्षित असल्याचे त्यांचे म्हणणे आयोगासमोर मांडले.

१) जनरल रजिस्टर - सन १९९७ पासून आजपर्यंत विद्यार्थी प्रवेशाच्या नोंदवहीची सत्यप्रत

२) सेवाज्येष्ठता यादीची अद्ययावत सत्यप्रत.

सदर माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे दोन मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आयनाले पद्माकर रामराव,व्यंकटेशनगर, अंबाजोगाई रोड, ज्ञानशेष निवास, बालाजी मंदीरच्या समोर,लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,लालबहादुर शास्त्री प्राथमिक विद्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कांबळे विलास गणपतराव, : अपिलार्थी
रा.हेर, ता.उदगीर,जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय,हेर,ता.उदगीर,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिति,उदगीर,जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९९६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कांबळे विलास गणपतराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, हेर,ता.उदगीर,जि.लातूर-श्री. मेनकुदळे राजेश वैजनाथ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, उदगीर, जि.लातूर - श्री. केंद्रे उत्तम मारुतीराव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०३.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९.०३.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०४.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेल्या युक्तिवादावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी ग्रामपंचायत, हेर येथील १२ व्या वित्त आयोगातून नाली व मुतारी बांधकामाचे मोजमापामध्ये नमूद केलेल्या रकमेपैकी तसेच उचल करण्यात आलेली रक्कम व उर्वरित रु.४०,०००/- चे कोणते काम करण्यात आले, त्या कामासंदर्भात अंदाजपत्रक व मोजमापपुस्तिकेच्या इ.तपशीलाची माहिती सत्यप्रतीच्या स्वरुपात मागितली आहे. त्यापैकी त्यांना या कामासाठी त्यावेळी झालेल्या खर्चाची कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.त्यातून उर्वरित रु.४०,०००/- बाबतचा तपशील आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडील सुनावणीच्या वेळी सोबत आणलेला आहे.ही माहिती आयोगाचे सूचनेनुसार अपिलार्थीस समक्ष देण्यात आली. अपिलार्थी यांनी ती स्वीकारली.

या पार्श्वभूमीवर आयोगाच्या स्तरावर अपील प्रकरण बंद करण्याचे सर्वानुमते ठरले.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कांबळे विलास गणपतराव,रा.हेर, ता.उदगीर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, हेर, ता. उदगीर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भंडे शिवाजी स्वरुपराव, : अपिलार्थी
रा.उदगीर, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, संत सावता माळी माध्यमिक विद्यालय,
दावणगाव,ता. उदगीर, जि.लातूर.
जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, लातूर.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/११०३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०८-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. भंडे शिवाजी स्वरुपराव | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -मुख्याध्यापक, संत सावता माळी माध्यमिक विद्यालय, दावणगाव,ता. उदगीर, जि.लातूर - श्री. शिवहार नागोराव रोडगे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.०२.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६.०४.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संत सावता माळी माध्यमिक विद्यालय, दावणगाव,ता. उदगीर, जि.लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.१३.१२.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये त्यांच्या शाळेशी संबंधित सन २००६ ते दि. २० ऑगस्ट २००९ या कालावधीची एकूण ३ मुद्यांद्वारे विस्तृत माहिती मागितली आहे. याकरिता रु.१८००/- शुल्काचा भरणा करावा, असे अपिलार्थीस दि. ०७.०१.२०११ रोजीच्या पत्राने कळविले आहे. हे पत्र अपिलार्थीस पोस्टाने पाठविले आहे. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात सांगितले की, असे पत्र त्यांना प्राप्त झाले नाही.यावर आयोगाचे निर्देश आहेत की, जन माहिती अधिकारी यांना एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. तथापि सर्व कागदपत्रे आवश्यक असल्यास सशुल्क देण्यात यावे.ही बाब अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संत सावता माळी माध्यमिक विद्यालय, दावणगाव, ता.उदगीर, जि.लातूर यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावेत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. तथापि सर्व कागदपत्रे आवश्यक असल्यास सशुल्क देण्यात यावेत.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०९-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भंडे शिवाजी स्वरुपराव,रा.एस.टी.कॉलनी, नळेगावरोड, मलकापूर (नवी वसाहत) उदगीर, जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संत सावता माळी माध्यमिक विद्यालय, दावणगाव,ता. उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, लातूर. यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. जमादार अलीमूहमद अबु मूहमद,<br>रा.देवणी, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्रा.),<br>जिल्हा परिषद, लातूर<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, लातूर | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जमादार अलीमहुमद अबुमहुमद | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक,गुलशन-ए-अत्फाल उर्दु प्राथमिक शाळा,देवणी, जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर- प्रतिनिधी-श्री. प्रवीण गायकवाड,अधीक्षक,वेतन व भ.नि.नि.पथक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३.०३.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६.०४.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०६.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन, अपिलार्थी यांच्या दि. २६.०४.२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २६.०४.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.२६.०४.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०८-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जमादार अलीमहूमद अबूमहूमद, रंगारीगल्ली, ता.देवणी, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,गुलशन-ए-अत्फाल उर्दु प्राथमिक शाळा, देवणी, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विश्वंभर सोनाजीराव वराट, : अपिलार्थी
रा.भोकरंबा, ता.रेणापूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक (माध्यमिक शिक्षण),लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१६४९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०८-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११.०३.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०७.०५.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०.०६.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली किंवा कसे तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला किंवा कसे याचा बोध होत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील

कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०७.०५.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक,माध्यमिक शिक्षण विभाग, लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक,माध्यमिक शिक्षण विभाग, लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.०७.०५.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विश्वंभर सोनाजीराव वराट,रा.भोकरंबा, ता.रेणापूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक,माध्यमिक शिक्षण विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आंगद गुणवंतराव कांबळे, : अपिलार्थी
मु. पो. तेलगाव, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तेलगाव,
तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदपूर,
जिल्हा लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८४१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०८-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. आंगद गुणवंतराव कांबळे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तेलगाव, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर - श्री. राऊत बी. आर. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अहमदपूर, जिल्हा लातूर - श्री. बिराजदार ए. एन. | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २७-१२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५-०२-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११-०२-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८-०३-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी सन २००३ ते २०१० या कालावधीची विविध तेरा मुद्दयावर विशेष करुन विकास कामाची माहिती मागितली आहे. सदरची माहिती एकत्र करुन संकलीत करण्यास काही कालावधी लागला. याकरिता त्यांच्या कार्यालयात मनुष्यबळ नाही व साधनसामग्रीचा अभाव आहे तरी माहिती एकत्रित करुन एकंदर २०३ पृष्ठांची माहिती दिनांक ०७-०२-२०११ रोजी अपिलार्थीस देण्यात आली आहे. प्रसंगवशात जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या नजरेस आणून दिले की,अपिलार्थी यांनी अशाच प्रकारे दहा अर्ज केले आहेत व या अर्जामध्ये पाच ते दहा वर्षाचा विस्तृत माहिती मागितली आहे व या सर्व अर्जावर त्यांना माहिती देण्यात आली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना माहिती मिळाली नाही.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिका-याने माहिती दिलेली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अहमदपूर, जिल्हा लातूर यांनी अपिलार्थीने त्यांना माहिती मिळाल्याने अपील निकाली काढावे असे दिनाक ०७-०२-२०११ रोजी त्यांच्या कार्यालयास कळविल्याचे नमूद करुन दिनांक ११-०२-२०११ रोजी अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले आहे. आज रोजी माहितीचा एक संच जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे तो आयोगाच्या सूचनेनुसार अपिलार्थीस देण्यात आला. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती, जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली साधनसामग्री व मनुष्यबळ विचारात घेता जन माहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० नुसार कारवाई करण्याची आवश्यकता आयोगास वाटत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली आहे ही बाब विचारात घेता प्रकरण निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आंगद गुणवंतराव कांबळे, मु. पो. तेलगाव, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तेलगाव, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विश्वनाथ बाबुराव आवाळे,<br>रा. शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विश्वनाथ बाबुराव आवाळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर - श्री. स्वामी अशोक सिद्राम | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर - श्री. पोतदार बालाजी जनार्धनराव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-१०-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-१२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३१-१२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०३-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ११-१०-२०१० च्या माहिती अर्जान्वये शिरुर अनंतपाळ येथील सरकारी पांदनवर झालेल्या अतिक्रमणाबाबतची तीन मुद्दयावर माहिती मागितली आहे. त्यातील मुद्दा क्रमांक १ या माहितीमधील नमुना नंबर ८ अ ची प्रत उपलब्ध झाली आहे. सदरची माहिती सन १९८०-८१ सालाची आहे ती सध्याचे जन माहिती

अधिकारी यांनी शोधून आज रोजी सोबत आणलेली आहे. उर्वरीत माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. मुद्दा क्रमांक ३ ची माहिती तहसील कार्यालयाकडे आहे त्याचप्रमाणे मुद्दा क्रमांक २ ची माहिती ग्रामपंचायत स्तरावरचीच आहे परंतु ती शोध घेऊनही सापडत नाही.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना आजपावेतो कागदपत्रे मिळालेली नाहीत. त्यांनी शासकीय जमिनीवर अतिक्रमण झाल्याबाबतची कागदपत्रे मागितलेली आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी मागितलेली कागदपत्रे आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहेत. नमुना नंबर ८ अ आणि पुढे जे हस्तांतरण झाले त्याचा फेरफार व नकला आहेत अशी एकूण २७ पृष्ठांची माहिती उपलब्ध आहे व ती आयोगाच्या सूचनेनुसार अपिलार्थीस देण्यात आली अपिलार्थीने ती स्विकारली आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन आयोगाच्या असे दृष्टोत्त्पतीस आले आहे की, सरकारी पांदनवर १९८०-८१ साली अतिक्रमण झालेले आहे व एका त्रयस्थाने त्यानंतर हस्तांतरण केले आहे. त्रयस्थ काशीनाथ देवगरे यांना कोणत्या आधारे पांदनीची जमीन देण्यात आली याबाबतची कागदपत्रे अपिलार्थी मागत आहे परंतु त्यांना ती मिळालेली नाहीत असे दिसून येत आहे. ही बाब जनहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. याकरिता जिल्हाधिकारी, लातूर यांनी व्यक्तिशः लक्ष पुरवून या प्रकरणात संपूर्ण चौकशी करणे आवश्यक वाटते. या कागदपत्रासाठी दोन कर्मचा-यांचे एक पथक तयार करुन शोध घेऊन अपिलार्थीस कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावीत. जर ही कागदपत्रे उपलब्ध झाली नाही तर संबंधिताविरुध्द सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ नुसार कारवाई योजावी, अशी त्यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

जिल्हाधिकारी, लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विश्वनाथ बाबुराव आवाळे, रा. शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुर्यकांत निवृत्तीराव कांबळे,<br>रा. अंधोरी, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| २. | श्री. शंकर महादेव मंगे,<br>रा. अंधोरी, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर | : | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अंधोरी, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अहमदपूर, जिल्हा लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९४३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शंकर महादेव मंगे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अंधोरी, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर - श्री. खाडे टी. डी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अहमदपूर, जिल्हा लातूर - श्री. बोंबले पी. व्ही. | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - श्री. बिराजदार ए. एन. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०२-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०७-०३-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०४-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. शंकर महादेव मंगे, जन माहिती अधिकारी आणि तत्कालीन व सध्याचे जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये ग्रामपंचायत कार्यालय अंधोरी अंतर्गत करण्यात आलेल्या विविध कामांची व ग्रामसभेच्या कामकाजाची विविध मुद्दयावर सन २००७ ते अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत अशी विस्तृत व मोठ्या कालावधीची माहिती मागितली आहे. सदरची माहिती संकलीत करण्यासाठी त्यांना कालावधी लागला. त्यांच्याकडे कोणीही मदतनीस नाही व कामकाज सांभाळून त्यांना ही माहिती संकलीत करावी लागली म्हणून झालेला विलंब क्षमापित करण्यात यावा अशी त्यांनी आयोगास विनंती केली. तसेच आज रोजी त्यांच्याकडे ३२० पृष्ठांची माहिती उपलब्ध आहे असेही त्यांनी आयोगास पुढे सांगितले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना माहिती मिळाली नाही. यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्याचे आयोगाने सूचित केले त्याप्रमाणे अपिलार्थीने ही माहिती स्विकारली.

अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती, जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आयोगास अवगत केलेल्या अडीअडचणी व आज रोजी उपलब्ध माहिती अपिलार्थीस देण्यात आली या बाबी विचारात घेता प्रकरणात झालेला विलंब क्षमापित करण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-०९-२०११**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुर्यकांत निवृत्तीराव कांबळे, रा. अंधोरी, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

२. श्री. शंकर महादेव मंगे, रा. अंधोरी, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

३. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अंधोरी, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अहमदपूर, जिल्हा

लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विष्णूदास रायभाण बोराडे, : अपिलार्थी
मु. पो. बावची, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बावची, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर,
जिल्हा लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९६८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०८-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बावची, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर - श्री. पाटील ए. टी. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर,<br>जिल्हा लातूर - श्री. व्ही. जी. लोखंडे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४-१२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०-१२-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २९-०१-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-०४-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १७-१२-२०१० च्या माहिती अर्जान्वये ग्रामपंचायतीच्या विविध विकास कामांची एकंदर आठ मुद्दयावर विस्तृत माहिती मागितली आहे. ही माहिती बहुतांश २००८ ते २०१० या कालावधीची आहे. माहितीच्या झेरॉक्स प्रती काढण्याकरिता येणारा खर्च विचारात घेऊन अपिलार्थीस रुपये ३००० चा भरणा ग्रामपंचायतकडे करावा व माहिती व्यक्तिशः घेऊन जावी असे दिनांक २०-१२-२०१० रोजी कळविले. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार आहेत. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील नाहीत असे आयोगाच्या नजरेस आणून देण्यात आले आहे. जन माहिती अधिका-याकडे माहिती उपलब्ध आहे. अपिलार्थी यांनी माहितीकरिता रुपये ३००० इतक्या शुल्काचा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरणा करावा व माहिती घेऊन जावी असे आयोग सूचित करीत आहे. त्यानंतर जास्त शुल्काची आवश्यकता भासल्यास तशी अपिलार्थीकडून मागणी करण्यात यावी व शुल्क शिल्लक राहत असल्यास ते अपिलार्थीस परत करावे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने शुल्काचा भरणा केल्यास त्यांना तीस दिवसाच्या आत माहिती पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-०९-२०११**

-----------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विष्णूदास रायभाण बोराडे, मु. पो. बावची, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बावची, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. देविदास रामराव गायकवाड, | : | अपिलार्थी |
| | 'श्री मावूली', दत्त मंदिर मागे, ड्रायव्हर कॉलनी, जुना औसा रोड, लातूर | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | कक्ष अधिकारी (सा. प्र.), जिल्हा परिषद, लातूर | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, लातूर | | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/११४९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : | उपस्थित |
| | अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर - प्रतिनिधी - श्री. जमादार बी. टी., प्रशासन अधिकारी | | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | उपस्थित |
| | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर - प्रतिनिधी - श्री. कोळनूरकर व्ही. एन., अधीक्षक | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-११-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११-०१-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०५-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगासमोरील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-०१-२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे. अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात यावी. अपिलार्थी उपस्थित झाले नाही तर कागदपत्रावरुन वस्तुनिष्ठ निर्णय घ्यावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-०१-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देविदास रामराव गायकवाड, 'श्री मावूली', दत्त मंदिर मागे, ड्रायव्हर कॉलनी, जुना औसा रोड, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. महालिंग मन्मथ किनीकर, | : | अपिलार्थी |
| | रा. पाखरसावंगी, तालुका जिल्हा लातूर | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पाखरसावंगी, | | |
| | तालुका जिल्हा लातूर | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर | | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३८४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : | उपस्थित |
| | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पाखरसावंगी, | | |
| | तालुका जिल्हा लातूर - श्री. व्ही. बी. देशमुख | | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | उपस्थित |
| | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर | | |
| | - श्री. एस. ए. हराळे | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-१२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०९-०२-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २८-०३-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०५-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २३-१२-२०१० च्या माहिती अर्जान्वये ग्रामपंचायत, पाखरसावंगी, तालुका जिल्हा लातूर मधील विविध योजना, ग्रामसभा इत्यादीबाबतची दिनांक २३-११-२००७ ते २३-१२-२०१० या कालावधीची विस्तृत माहिती मागितली आहे. सदरची माहिती संकलीत करण्यासाठी काही कालावधी लागला व माहिती संकलीत करुन दिनांक ०६-०९-२०११ रोजी अपिलार्थीस विनामूल्य देण्यात आली आहे. ही माहिती सुमारे ४०० पृष्ठांची आहे. अपिलार्थी यांना माहिती मिळाली आहे व त्यांनी पोच दिली आहे ती जन माहिती अधिकारी यांच्या दप्तरी दाखल आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत.तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रां वरुन त्यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांना दिनांक ०६-०९-२०११ रोजी लिहिलेल्या पत्राची प्रत आयोगासमोर आहे. त्यामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, दिनांक ०६-०९-२०११ रोजी त्यांना दिनांक २३-१२-२०१० च्या अर्जामधील मागितलेली संपूर्ण माहिती मिळाली असून त्यांचे समाधान झाले आहे, त्यामुळे व्दितीय अपील माघारी घेत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महालिंग मन्मथ किनीकर, रा. पाखरसावंगी, तालुका जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पाखरसावंगी, तालुका जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गोपाळ सदाशिव गाडेकर,<br>मु. पो. गंगापूर, तालुका जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४२८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गोपाळ सदाशिव गाडेकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर<br>- श्री. एस. ए. हराळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०६-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक १०-०१-२०११ च्या माहिती अर्जान्वये ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटूंबाची गणना सन २००२-२००३ अंतर्गत कुटूंबपत्रकाची माहिती मागितली आहे. ही कागदपत्रे इंग्रजीमध्ये असून त्याचे भाषांतर करुन

अपिलार्थीस मराठीतील कागदपत्रे देण्यात आलेली आहेत. तथापि अपिलार्थी यांनी त्यांच्या कुटूंबाच्या गणनेबाबत नमुना कागदपत्रामध्ये जी माहिती भरुन दिली आहे त्याची प्रत ते मागत आहेत ती त्यांना देय होते. तरी जन माहिती अधिकारी यांना एन. आय. सी. शी संपर्क साधून अपिलार्थी यांनी जी मूळ कागदपत्रे सादर केली आहे त्याचा शोध घेऊन त्याची प्रत अपिलार्थीस द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच साठ दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गोपाळ सदाशिव गाडेकर, मु. पो. गंगापूर, तालुका जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आंगद दामोधर गायकवाड, : अपिलार्थी
रा. पो. तांदुळजा, तालुका जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तांदुळजा,
तालुका जिल्हा लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४४७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०८-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. आंगद दामोधर गायकवाड | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तांदुळजा,<br>तालुका जिल्हा लातूर - श्री. बी. एस. वाघमारे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर<br>- श्री. एस. ए. हराळे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०७-०३-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-०४-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-०६-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद त्याचप्रमाणे अपिलार्थीच्या माहिती अर्जावरुन असे आढळून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये अनेक मुद्दयावर प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितली आहे व काही ठिकाणी लेखी स्वरुपात माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी ही माहिती सुसंगत होत नाही त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देय होत नाही. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे हे अपील या स्तरावर बंद करण्यात येत आहे. अपिलार्थी यांनी त्यांना आवश्यक असलेली माहिती कागदपत्राच्या स्वरुपात मागवावी असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात आले व ही बाब अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी मान्य केली.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आंगद दामोधर गायकवाड, रा. पो. तांदुळजा, तालुका जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तांदुळजा, तालुका जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आंगद दामोधर गायकवाड, : अपिलार्थी
रा. पो. तांदुळजा, तालुका जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तांदुळजा,
तालुका जिल्हा लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४५० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. आंगद दामोधर गायकवाड | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तांदुळजा, तालुका जिल्हा लातूर - श्री. बी. एस. वाघमारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर - श्री. एस. ए. हराळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०२-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०-०३-२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०४-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०६-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०३-२०११ रोजी माहिती पाठविण्याचा प्रयत्न केला आहे. ती अपिलार्थीस दिनांक ०५-०४-२०११ रोजी मिळाली आहे. तथापि अपिलार्थीस काही माहिती अपूर्ण मिळाली आहे ती खालील प्रमाणे आहे.

१. दोन त्रयस्थ श्री. अशोक गणपत शिंदे व श्री. जयसिंग वराडे यांच्या घरासमोरील सार्वजनिक रस्त्याबाबतची माहिती. यावर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, हा सार्वजनिक रस्ता नाही व त्याची नोंद फार्म - २६ वर आहे. याकरिता जन माहिती अधिकारी यांना फार्म - २६ ची प्रत अपिलार्थीस विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी लागेल.

२. मुद्दा क्रमांक २ बाबत संचिके मधून दिनांक ३१-०३-२०१० चे पत्र व त्यानंतर प्रकरण न्यायालयात जाण्याचा दिनांक या दरम्यानच्या काळात केलेल्या कार्यवाहीची कागदपत्रे अपिलार्थीस देय होत आहे. त्या संचिकेचा जन माहिती अधिकारी यांनी शोध घेऊन माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी. जर ही संचिका प्राप्त झाली नाही तर गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांना पुढील कार्यवाहीसाठी जन माहिती अधिकारी यांना कळवावे लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आंगद दामोधर गायकवाड, रा. पो. तांदुळजा, तालुका जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तांदुळजा, तालुका जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. श्रीस्वामी बस्वेश्वर काशिनाथ,<br>मु. पो. साकोळ, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, साकोळ, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१५२४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०८-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. श्रीस्वामी बस्वेश्वर काशिनाथ | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, साकोळ, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर<br>- श्री. अंबुलगेकर संजय श्रीनिवास | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर - श्री. पोतदार बालाजी जनार्धनराव | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०-०३-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०-०४-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११-०५-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०६-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार आहे. अपिलार्थी यांनी सहा वर्षाची माहिती मागितली आहे ती एका महिन्यात संकलीत करुन देणे शक्य झाले नाही. आज रोजी ३०७ पृष्ठांची माहिती त्यांनी सोबत आणली आहे. आयोगाच्या सूचनेप्रमाणे ती सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस देण्यात आली. अपिलार्थीने ती स्विकारली. आयोगाने अपिलार्थी यांना सूचित केले त्यांना आज रोजी माहिती प्राप्त झाली असल्याकारणाने त्यांनी या माहितीची पाहणी करून नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे ही बाब त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०८-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीस्वामी बस्वेश्वर काशिनाथ, मु. पो. साकोळ, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, साकोळ, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शेख लालासाहेब राजेसाहेब,<br>नगर परिषद शाळा क्रमांक ३२, बरकत नगर, लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर विभाग, लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>धर्मादाय उपायुक्त, धर्मादाय उपायुक्त कार्यालय, लातूर विभाग, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/००१२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर विभाग, लातूर - श्री. क्षीरसागर एन. एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>धर्मादाय उपायुक्त, धर्मादाय उपायुक्त कार्यालय, लातूर विभाग, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष : वीर माता जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक विचार विकास मंडळ, चाकूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-१०-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१-१०-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४-१२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०१-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

उपलब्ध कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी दिनांक ०७-१०-२०१० च्या माहिती अर्जान्वये वीरमाता जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक विचार विकास मंडळ चाकूर या संस्थेची नोंदणी नाकारण्यात आली आहे त्यासंबंधात कोणत्या नियम / अधिनियम यांचा आधार घेऊन नाकारण्यात आली आहे अशी प्रश्नार्थक स्वरुपाची व खुलासेवजा माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत दिनांक २१-१०-२०१० रोजी प्रतिसाद देऊन कळविले आहे की, सदरील नोंदणी नाकारण्यासाठी संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मधील तरतुदी विचारात घेतल्या आहेत त्याचे अवलोकन करावे नाकारण्यात आलेल्या आदेशाच्या प्रती हव्या असल्यास रुपये दहा इतक्या शुल्काचा भरणा करावा म्हणजे माहिती देता येईल. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी घेतलेली कारणमिमांसा दिनांक ०३-१२-२०१० रोजी निर्गमित केली आहे त्याच्याशी आयोग सहमत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०९-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख लालासाहेब राजेसाहेब, नगर परिषद शाळा क्रमांक ३२, बरकत नगर, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा धर्मादाय उपायुक्त, धर्मादाय उपायुक्त कार्यालय, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मलंग अब्दुल रहमान मो. इस्माईल,<br>रा. दबीरपुरा, उदगीर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>सह दुय्यम निबंधक कार्यालय वर्ग-२, उदगीर, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह जिल्हा निबंधक वर्ग-१, सह जिल्हा निबंधक कार्यालय, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३८५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सह दुय्यम निबंधक, उदगीर, जिल्हा लातूर<br>- श्री. एस. वि. निलावड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह जिल्हा निबंधक वर्ग-१, सह जिल्हा निबंधक कार्यालय, लातूर - श्री. एन. बि. विभुते | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष : श्री. रहमत बी. महमद ईस्माईल मलंग व इतर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-११-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०९-१२-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३१-१२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४-०१-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०२-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २३-११-२०१० च्या माहिती अर्जान्वये एकूण चार मुद्दयावर त्रयस्थाच्या खरेदीखताच्या सत्यप्रती इत्यादीची

माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी याकरिता नोंदणी कायदा १९०८ चे कलम ७८ मधील तरतुदीनुसार शुल्काचा भरणा केल्यास माहिती देता येईल असे अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत कळविले आहे. तथापि अपिलार्थी यांनी यावर प्रतिसाद दिलेला नाही. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, सह जिल्हा निबंधक कार्यालय, लातूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १७-०१-२०११ रोजी सुनावणी घेतली त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. सुनावणीनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०१-२०११ रोजी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले शुल्क भरल्यास माहिती द्यावी असा निर्णय देऊन अपील निकाली काढले.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता विहित मुदीत कलम ७ (१) नुसार प्रतिसाद दिलेला आहे. तथापि अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केलेला दिसत नाही. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २००५ मधील तरतुदी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी शुल्काची केलेली मागणी आयोगास योग्य दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता आयोग अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०९-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मलंग अब्दुल रहमान मो. इस्माईल, रा. दबीरपुरा, उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, सह जिल्हा निबंधक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. संजय तुकाराम पवार, | : | अपिलार्थी |
| | रा. हडळतो, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर | | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/६०९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर - श्री. कांबळे के. एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष : श्री. सतिश धोंडीराम मलशेटी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०-१०-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-११-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८-१२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०३-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक २३-०९-२०१० च्या माहिती अर्जान्वये त्रयस्थ पक्ष यांची ०१ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००९ या कालावधीतील विक्री केलेल्या

रॉकेलबाबत तपशीलवार माहिती व्यक्तिशः मागितली आहे. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अहमदपूर यांनी अपिलार्थीस दिनांक २०-१०-२०१० रोजी कळविले आहे की, संबंधित रेकॉर्ड हरविले आहे त्यामुळे माहिती उपलब्ध नाही त्याबाबत त्रयस्थाने पोलीस स्टेशन अहमदपूर येथे केलेला अर्ज व प्रमाणपत्राच्या प्रती अपिलार्थीस देण्यात आल्या आहेत. अपिलार्थी यांनी याबाबतची नोंद घेतली असून त्याप्रमाणे त्यांनी पोलीस स्टेशन अहमदपूर येथे तक्रार केल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी माहिती देणे सद्यस्थितीत देणे शक्य नाही तथापि माहिती उपलब्ध होताच देण्यात यावी असा निर्णय घेऊन संचिका बंद करण्याचा आदेश दिला आहे. सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते असे दिसून येत आहे. सद्यस्थितीत माहिती अपिलार्थीस उपलब्ध होऊ शकत नाही त्यामुळे सदरचे प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय तुकाराम पवार, रा. हडळतो, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख मुहम्मद खुर्रम अ. रशिदसाब, : अपिलार्थी
छोटी मस्जीदजवळ, निलंगा, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९५४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, लातूर - आबेद अली काशीम सहाब | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. एस. एन. जफर, वक्फ अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६-१०-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०९-१२-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३-१२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०४-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १३-१२-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे. अपिलार्थी प्रथम अपिलाच्या सुनावणीस उपस्थित रहात नाहीत असे आयोगाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे. त्यांना सुनावणीस उपस्थित राहून सहकार्य करावे लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक १३-१२-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख मुहम्मद खुर्रम अ. रशिदसाब, छोटी मस्जीदजवळ, निलंगा, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दशरथ आच्युतराव होळे, | : | अपिलार्थी |
| रा. आष्टामोड, पो. गांजूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| कृषि उपसंचालक (क.क.), कृषि आयुक्तालय, म. रा. पुणे | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| कृषि सह संचालक (आस्थापना), साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि उपसंचालक (क.क.), कृषि आयुक्तालय, म. रा. पुणे | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कृषि सह संचालक (आस्थापना), साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७-१०-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | १८-१०-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९-११-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | २३-१२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०३-२०११ (पुणे कार्यालयाकडे प्राप्त )<br>दि. १३-०४-२०११ (औरंगाबाद कार्यालयाकडे प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक ०७-१०-०२०१० च्या माहिती अर्जान्वये अपिलार्थी यांनी दिनांक २४-०८-२०१० रोजी दिलेल्या निवेदनावर केलेल्या चौकशी

अहवालाची सत्यप्रत मागितली आहे. सदरचाअर्ज दिनांक १५-१०-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक (क.क.), कृषि आयुक्तालय, म. रा. पुणे यांच्याकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे व दिनांक १६-११-२०१० रोजीच्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीबाबत त्यांची मागणी माहिती या शब्दाच्या व्याख्येत येत नसल्याचे कळवून त्यांचा अर्ज निकाली काढला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक २३-१२-२०१० रोजी निर्णय दिला आहे. अपिलार्थीस अपेक्षित माहितीची निर्मिती झाली नसल्याचे कळवून वस्तुस्थिती अपिलार्थीच्या निदर्शनास आणून देण्यात आलेली आहे. त्यामुळे अपिलार्थीचे अपील अमान्य करण्यात आले आहे. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दशरथ आच्युतराव होळे, रा. आष्टामोड, पो. गांजूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक (क.क.), कृषि आयुक्तालय, म. रा. पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कृषि सह संचालक (आस्थापना), साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आयनाले पदमाकर रामराव, : अपिलार्थी

व्यंकटेश नगर, अंबाजोगाई रोड, ज्ञानशेष निवास, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे

जन अपिलीय अधिकारी तथा :

संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/११६६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. आयनाले पदमाकर रामराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे - श्री. भि. पां. कांबळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे - श्री. ह. ई. शिंदे | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - श्री. वि. ना. सांगदे | : | उपस्थित |
| ३.५ | त्रयस्थ पक्ष : श्री. सुर्यवंशी व्ही. सी. व श्री. बिरादार बी. पी. - प्रतिनिधी - श्री. माने के. जी. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३-१२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०१-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०५-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांचे प्रतिनिधी श्री. माने के. जी. उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १३-१२-२०१० च्या माहिती अर्जान्वये दोन त्रयस्थ श्री. सुर्यवंशी व्ही. सी. व श्री. बिरादार बी. पी. यांच्याबाबत पत्राव्दारे डि एड प्रवेशासाठी लागणा-या कागदपत्राच्या सर्व संचिकेच्या झेरॉक्स प्रती मागितल्या आहेत. यावर जन माहिती अधिकारी तथा उप संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी अपिलार्थीच्या या माहिती अर्जावर दिनांक ०४-०१-२०११ रोजीच्या पत्रान्वये प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दोन वर्षाने सर्व अर्ज / आवेदनपत्र निर्लेखित करण्यात येत असल्याने माहिती देता येत नाही असे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, दिनांक १५-११-२००८ च्या राज्यस्तरीय डि एड प्रवेश नियंत्रण व प्रवेश संनियंत्रण समितीच्या बैठकीतील विषय क्रमांक ४ नुसार प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर जास्तीत जास्त दोन वर्षे आवेदनपत्र, अर्ज व कागदपत्रे जतन करुन ठेवावेत व त्यानंतर त्याचे निर्लेखित करावे असा निर्णय घेतला आहे त्यामुळे माहिती उपलब्ध नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी दिनांक १०-०२-२०११ रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, उपरोक्त परिस्थितीमुळे सध्या कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे देता येत नाही त्यामुळे अपील निकाली काढण्यात येत आहे. अपिलार्थी यांनी सदरच्या बाबीची सुनावणीच्या वेळी नोंद घेतली आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०९-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आयनाले पदमाकर रामराव, व्यंकटेश नगर, अंबाजोगाई रोड, ज्ञानशेष निवास, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा उप संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,

पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. आयनाले पदमाकर रामराव,<br>व्यंकटेश नगर, अंबाजोगाई रोड, ज्ञानशेष निवास, लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/११६७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. आयनाले पदमाकर रामराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे - श्री. भि. पां. कांबळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे - श्री. ह. ई. शिंदे | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - श्री. वि. ना. सांगदे | : | उपस्थित |
| ३.५ | त्रयस्थ पक्ष : लालबहादूर शास्त्री प्रा. शाळा, लातूर व श्रीमती शेख ममतान किरीमसाब<br>- प्रतिनिधी - श्री. माने के. जी. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३-१२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९-०१-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १०-०२-२०११ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०५-०५-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांचे प्रतिनिधी श्री. माने के. जी. उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १३-१२-२०१० च्या माहिती अर्जान्वये दोन त्रयस्थ लालबहादूर शास्त्री प्रा. शाळा, लातूर व श्रीमती शेख ममतान किरीमसाब यांच्याबाबत पत्राव्दारे डि एड प्रवेशासाठी लागणा-या कागदपत्रांच्या सर्व संचिकेच्या झेरॉक्स प्रती मागितल्या आहेत. यावर जन माहिती अधिकारी तथा उप संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी अपिलार्थीच्या या माहिती अर्जावर दिनांक ०४-०१-२०११ रोजीच्या पत्रान्वये प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दोन वर्षाने सर्व अर्ज / आवेदनपत्र निर्लेखित करण्यात येत असल्याने माहिती देता येत नाही असे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, दिनांक १५-११-२००८ च्या राज्यस्तरीय डि एड प्रवेश नियंत्रण व प्रवेश संनियंत्रण समितीच्या बैठकीतील विषय क्रमांक ४ नुसार प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर जास्तीत जास्त दोन वर्षे आवेदनपत्र, अर्ज व कागदपत्रे जतन करुन ठेवावेत व त्यानंतर त्याचे निर्लेखित करावे असा निर्णय घेतला आहे त्यामुळे माहिती उपलब्ध नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी दिनांक १०-०२-२०११ रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, उपरोक्त परिस्थितीमुळे सध्या कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे देता येत नाही त्यामुळे अपील निकाली काढण्यात येत आहे. अपिलार्थी यांनी सदरच्या बाबीची सुनावणीच्या वेळी नोंद घेतली आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०९-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आयनाले पदमाकर रामराव, व्यंकटेश नगर, अंबाजोगाई रोड, ज्ञानशेष निवास, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा उप संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बोधले नरेंद्र गणेश, : अपिलार्थी
हमशी नगर, मस्जीदजवळ, औसा, तालुका औसा,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सह संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ४१२ ई,
शिवाजीनगर, पुणे

जन अपिलीय अधिकारी तथा :
सह संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ४१२ ई, पुणे

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१२३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - प्रतिनिधी - श्री. बोधले गणेश शिवाजीराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>कार्यालय सह संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ४१२ ई, शिवाजीनगर, पुणे | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ४१२ ई, पुणे | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४-११-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२-१२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०४-२०११ पुणे कार्यालयाकडे प्राप्त<br>०९-०५-२०११ औरंगाबाद |

कार्यालयाकडे
प्राप्त

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २२-१२-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ४१२ ई, पुणे यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे. सुनावणीचा निर्णय पारीत करताना अपिलार्थी यांना संधी देण्यात यावी व अपिलार्थी यांनी उपस्थित राहावे. अपिलार्थी उपस्थित राहिले नाहीत तर वस्तुनिष्ठ निर्णय घ्यावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ४१२ ई, पुणे यांनी अपिलार्थीच्या दिनांक २२-१२-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०९-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बोधले नरेंद्र गणेश, हमशी नगर, मस्जीदजवळ, औसा, तालुका औसा, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी, कार्यालय सह संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ४१२ ई,

शिवाजीनगर, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ४१२ ई, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मणियार श्रीरंग कस्तुरचंद, : अपिलार्थी
स्वामी राघवेंद्र कॉलनी, मंत्री रो हाऊसेस जवळ, डॉ. लक्ष्मीकांत कुलकर्णी यांचे घर, लक्ष्मी कॉलनी, जुना औसा रोड, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप अधीक्षक, भूमि अभिलेख, सेंट्रल बिल्डींग, लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक, भूमि अभिलेख, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१५२२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०९-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अधीक्षक, भूमि अभिलेख, लातूर - श्री. ए. जी. मरेवार | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, लातूर<br>- प्रतिनिधी - शिरस्तेदार, श्री. झुंजारे एल. ए. | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१-०२-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५-०३-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०६-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १२-०१-२०११ च्या माहिती अर्जान्वये १९९७ पासूनची एकूण पाच मुद्दयावर नंदी स्टॉपच्या पुर्वेकडील बाजूस

असलेले सर्व्हे नंबर १९१ मधील सिटी सर्व्हे नंबर १०५५१, ३८४५ व ३८४९ बाबत स्वतःची व दोन त्रयस्थांची माहिती मागितली आहे. सदरची माहिती विस्तृत असल्याने संकलीत करण्यास कालावधी लागला. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-०३-२०११ रोजी रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी माहिती द्यावी असा निर्णय घेतला व दिनांक १५-०३-२०११ रोजी प्रथम अपील निकाली काढले. तदनुसार एकूण २६६ पृष्ठाची माहिती विनामूल्य अपिलार्थीस दिनांक १४-०३-२०११ रोजी देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी याबाबतची पोच दिली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहे. त्यांनी अपूर्ण माहिती मिळाली असे त्यांच्या व्दितीय अपिलात नमूद केले आहे. याबाबत नेमकी अपूर्ण माहिती कोणती मिळाली हे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना आयोगाच्या आदेशाप्रमाणे पंधरा दिवसाच्या आत कळवावे लागेल व त्यानंतर सदरची माहिती त्रयस्थांच्या संदर्भात असल्यास जन माहिती अधिकारी यांना त्रयस्थांची बाजू ऐकून घेऊन व्यापक जनहिताचा कसोटीवर उतरत असल्यास ही माहिती अपिलार्थीस देण्याचा निर्णय घ्यावा लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी विहीत मुदतीत कळविल्यास माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मणियार श्रीरंग कस्तुरचंद, स्वामी राघवेंद्र कॉलनी, मंत्री रो हाऊसेस जवळ, डॉ. लक्ष्मीकांत कुलकर्णी यांचे घर, लक्ष्मी कॉलनी, जुना औसा रोड, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक, भूमि अभिलेख, सेंट्रल बिल्डींग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. निलेश अशोकराव हिप्पलगावकर,<br>श्याम सोसायटी, रामनगर, देगलूर रोड, उदगीर,<br>तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१६४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर - श्री. क्षीरसागर व्ही. व्ही. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०३-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९-०४-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०६-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०९-०३-२०११ च्या माहिती अर्जान्वये त्रयस्थ अनंतवाळ, रॉकेल विक्रेते, उदगीर शहर यांच्या केरोसीन वाटपाबाबतच्या रजिस्टरची प्रत, पावती पुस्तकाची झेरॉक्स इत्यादी माहिती मागितली आहे. सदरची माहिती संकलीत करुन त्याच्या झेराक्स प्रती काढून अपिलार्थीस दिनांक ०२-०९-२०११ रोजीच्या पत्रान्वये एकूण ३६ पृष्ठे माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांनी दिनांक ०३-०९-२०११ रोजी माहिती मिळाल्याची पोच दिली आहे. अपिलार्थी यांचे व्दितीय अपील दिनांक २०-०६-२०११ रोजीचे आहे. यानंतर अपिलार्थीस माहिती मिळाली आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०९-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. निलेश अशोकराव हिप्पलगावकर, श्याम सोसायटी, रामनगर, देगलूर रोड, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बोधले गणेश शिवाजीराव, : अपिलार्थी
रा.औसा, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद, औसा, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद, औसा, जि.लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/६२२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०९-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बोधले गणेश शिवाजीराव | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०४.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २२.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०.०३.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगासमोर करण्यात आलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही, असे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या

समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २२.१२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, औसा, जि.लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी मुख्याधिकारी, नगर परिषद, औसा, जि.लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.२२.१२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बोधले गणेश शिवाजीराव, शिल्प निदेशक, आय.टी.आय.औसा, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी, नगर परिषद, औसा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, औसा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विश्वनाथराव गणपतराव गायकवाड, : अपिलार्थी
रा. लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नगर रचनाकार,
नगर परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/७४१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०९-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नगर रचनाकार, नगर परिषद, लातूर - श्री. सतीश शिवणे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ३०.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.०३.२०११ (फेरसादर,दि.०२.०८.२०११) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर परिषद, लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.२३.११.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये लातूर नगर परिषदेअंतर्गत स.नं. १४० तसेच १३९ मधील साईट क्र. १०८,१०९,११०,१११,११२ आणि लातूर येथील मध्यवर्ती टाऊन हॉलचे मैदान तसेच शहराच्या विकास आराखडयाची व नकाशाची प्रत अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली सर्व माहिती अधिनियमातील कलम ७(१) अन्वये विहित मुदतीत दि. १४.१२.२०१० रोजी पाठविली आहे. अपिलार्थी यांना ही माहिती प्राप्त झाली आहे. त्याची पोच जन माहिती अधिकारी यांच्या दप्तरी उपलब्ध आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोगास वरील बाबी दिसून येत आहेत. अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपिलामध्ये आवश्यक असलेल्या माहितीचे स्वरुप व विषयामध्ये जी माहिती नमूद केली आहे, ती माहिती या पूर्वीच अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये समाविष्ट आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी सांगितले. याप्रमाणे अपिलार्थीस कळविण्याची व्यवस्था सध्याच्या जन माहिती अधिकारी यांना करावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे कळवावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विश्वनाथराव गणपतराव गायकवाड,'ऋणानुबंध',संत ज्ञानेश्वर नगर, खोपेगावरोड, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुरेश व्यंकटराव बुलबुले, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नगर रचनाकार,
नगर परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९२८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नगर रचनाकार, नगर परिषद, लातूर - श्री. सतीश शिवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७.०३.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०४.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार,नगर परिषद, लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.१६.१२.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये लातूर येथील पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर बांधकाम सुरु असलेल्या एका बहुमजली इमारतीचा बांधकाम परवाना व नकाशाची सत्यप्रत व अंबाजोगाई रोडवर श्री. जोधवानी यांच्या बांधकाम सुरु असलेल्या बहुमजली हॉटेलचा बांधकाम परवाना व नकाशाची सत्यप्रत अशी माहिती मागितली आहे. यावर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.१२.२०१० रोजी अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद देऊन कळविले आहे की, इमारत धारकाचे नाव, दिनांक इत्यादी दिल्यास त्यांच्या कार्यालयातील अभिलेखात माहितीचा शोध घेऊन अपिलार्थीस देणे शक्य होईल. यावर अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही.

उपलब्ध कागदपत्रांवरुन वरील बाबी दिसून येत आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तरी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना वरील तपशील पंधरा दिवसांच्या आत कळवावा. तदनंतर पुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती विनामूल्य द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपिलार्थी यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचा वर नमूद केल्याप्रमाणे तपशील कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुरेश व्यंकटराव बुलबुले, २३/७२, कापड लाईन लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पंजाब राजाराम देशमुख, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अधीक्षक अभियंता,
नांदेड यांत्रिकी मंडळ कार्यालय,नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
यांत्रिकी मंडळ (उ व सं),नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११५७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. पंजाब राजाराम देशमुख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (उ.सं.), नांदेड - श्री. रा.भू.कंदकुर्तीकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, नांदेड - श्री. प्र.मा.वसमते | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (उ.व सं.), नांदेड - श्री. भानुदास भगवानदास सरवैय्या | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५.०६.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक अभियंता,यांत्रिकी मंडळ (उ सं),नांदेड यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.०५.०४.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये त्रयस्थ श्री.नारायणराव किशनराव क्षीरसागर, यांच्या मेकॅनिकल टेक्नीकल असिस्टंट या पदाच्या सेवेबाबतची सन १६६२ ते २०१० या कालावधीची माहिती मागितली आहे. प्रसंगावशात अपिलार्थी श्री.पंजाबराव राजाराम देशमुख हे त्रयस्थांसाठी माहिती मागण्याचा प्रयत्न करत आहेत व त्रयस्थ श्री.नारायणराव किशनराव क्षीरसागर हे ज्येष्ठ नागरिक असून त्यांचे वय वर्षे ७४ आहे. जन माहिती अधिकारी क्र.१ तथा उपअधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (उ.सं.), नांदेड यांनी त्यांचे कार्यालय १९९१ पासून निर्माण झाले असल्यामुळे व अपिलार्थी यांनी सन १९६२ बाबतची माहिती मागितली असल्याकारणाने व नांदेड हा विभाग सर्वात जुना असल्या कारणाने त्यांच्याकडे माहिती उपलब्ध असण्याची शक्यता असल्याने त्यांच्याकडे अपिलार्थी यांचा अर्ज वर्ग करण्यात आला, असेही पुढे अवगत केले.

जन माहिती अधिकारी क्र.२ तथा कार्यकारी अभियंता,यांत्रिकी विभाग, नांदेड उर्ध्वगंगा प्रकल्प यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांच्या अर्जावर त्यांच्या कार्यालयामध्ये शोध घेतल्यावर त्यांना माहिती प्राप्त होऊ शकली नाही. बारुळ हा उपविभाग त्यांच्याअंतर्गत नव्हता. सदरचा उपविभाग बंद झाल्यावर न्यु गेट उपविभाग येलदरी यांच्याकडे जोडण्यात आला, असे अभिलेखावरुन दिसत आहे. अपिलार्थी यांना त्यांच्या कार्यालयात उपलब्ध अभिलेखांची पाहणी देण्याकरिता दि. १३.०५.२०१० रोजीच्या पत्राद्वारे संधी देण्यात आली. त्याप्रमाणे अपिलार्थी यांनी अभिलेखांची पाहणी केली आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांना अभिलेखांची पाहणी करण्याची संधी देण्यात आली आहे. त्यांनी माहितीची पाहणी केली आहे. त्यामध्ये त्यांना त्रयस्थ पक्ष-श्री. नारायणराव किशनराव क्षीरसागर यांच्यासंदर्भात सन १९६३ सालच्या मासिक लेख्यामध्ये कॅम्प बारुळ येथे टेक्नीकल असिस्टंट या पदावर काम केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी पुढे असेही आयोगास अवगत केले की, यांत्रिकी विभाग क्र. २ औरंगाबाद व यांत्रिकी विभाग उस्मानाबाद यांच्याकडे त्यांनी मागितलेल्या माहितीशी संबंधित कागदपत्रे उपलब्ध होऊ शकतात. असा त्यांचा कयास आहे व त्यामुळे या अभिलेखांची पाहणी ते करु शकतात. तथापि या दोनही विभागामध्ये अपिलार्थीने मागितलेली माहिती उपलब्ध नाही, असे पत्र कार्यकारी अभियंता यांना प्राप्त झाले आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थी हे त्रयस्थ ज्येष्ठ नागरिकासाठी माहिती एकत्रित करीत आहेत, असे दिसून येत आहे. दि.१३.०५.२०१० रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने अभिलेखांच्या पाहणीनंतर त्यांना सन १९६३ सालची माहिती आढळून आली आहे.आता यांत्रिकी विभाग क्र.२,औरंगाबाद व उस्मानाबाद यांच्याकडे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणी करण्याकरिता दोनही कार्यकारी अभियंता यांनी एक-एक दिवस (वेळ सकाळी

११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन देणे योग्य ठरत आहे व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य देण्यात याव्यात. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे पूर्वसूचना देण्यात यावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

यांत्रिकी विभाग क्र.२,औरंगाबाद व यांत्रिकी विभाग,उस्मानाबाद यांच्याकडे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणी करण्याकरिता दोनही कार्यकारी अभियंता यांनी एक-एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात.ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पंजाब राजाराम देशमुख, रोहन ड्रेसेस, राजाई एनक्लेव्ह, वामननगर, पुर्णा रोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (उ.सं.), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग क्र.२,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

६. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (उ.सं.), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाबू विठ्ठलराव गायकवाड, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नगर रचनाकार,
नगर परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३१५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नगर रचनाकार, नगर परिषद, लातूर- सतीश शिवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. गोविंदलाल नावंदर व सौ. रुक्मीनीबाई नावंदर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १०.०१.२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | अस्पष्ट दिनांक |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०५.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर परिषद, लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.२४.१२.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये दोन त्रयस्थ व्यक्तींच्या प्लॉटबाबतची माहिती एकूण दोन मुद्यांद्वारे मागितली आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. १०.०१.२०११ रोजी अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीकडून माहितीचा काही तपशील मागितला जेणेकरुन अभिलेखे तपासून माहिती देणे शक्य होईल. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २१.०४.२०१० रोजी पुन्हा एकदा पत्र देऊन तपशील मागितला आहे. सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी अभिलेखांचा शोध घेतला, त्यामध्ये त्यांना अशाप्रकारचे बांधकाम करण्यास अनुमती दिल्याचे आढळून आले नाही. त्याप्रमाणे अपिलार्थीस दि. २९.०८.२०११ रोजी कळविण्यात आले आहे. त्यासंदर्भातील अपिलार्थीची पोच त्यांच्या दप्तरी उपलब्ध आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०९-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाबु विठ्ठलराव गायकवाड, मंत्रीनगर, सुतगिरणी रोड, लातूर
२. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार,नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संभाजी हणमंत मुंढे,<br>रा.मोहनाल, ता.चाकूर,जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर, जि.लातूर<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग,नांदेड | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१६८९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संभाजी हणमंत मुंढे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्राचार्य, महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर, जि.लातूर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभागीय शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग,नांदेड - प्रतिनिधी - श्री. दीपक देशपांडे, उच्च श्रेणी लघुलेखक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४.०२.२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७.०२.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ११.०४.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०७.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर, जि.लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.१०.०१.२०११ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या महाविद्यालयातील हंगामी (नॉन टिचींग) कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या वेतनाच्या कॅशबुकच्या छायांकित प्रती अशी माहिती मागितली आहे. त्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या महाविद्यालयात सन २००४ ते २०१० पर्यंत हंगामी (नॉन टिचींग) कर्मचाऱ्यांना घेण्यात आले नसल्याने त्यांना पगार देण्यात येण्याचा प्रश्नच नाही. त्यामुळे कॅशबुकमध्ये नोंदी नाहीत तसेच टाईमचेक मशिनमध्ये देखील हजेरी नाही,असे अपिलार्थीस दि. ०४.०२.२०११ रोजी कळविले आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, सन २००४-१० या कालावधीत सेवक म्हणून महाविद्यालयात कार्यरत होते. त्याबाबतची काही कागदपत्रे त्यांच्या जवळ आहेत. त्याचप्रमाणे टाईम चेक मशीनवरही चार महिने काम केलेले आहे. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग,नांदेड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ११.०४.२०११ रोजी निर्णय निर्गमित केला आहे की, अपिलार्थीस दहा दिवसांच्या आत माहिती द्यावी. तथापि यामध्ये वरील बाबी विचारात घेतलेल्या आढळून येत नाहीत.

या सर्व बाबी विचारात घेता यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणती कागदपत्रे उपलब्ध होणे शक्य आहे व अपिलार्थी नेमके कोणाकडे (संबंधित संस्था किंवा महाविद्यालय)सेवा करत होते याचा ऊहापोह होऊन देय असलेली कागदपत्रे देण्याबाबत निर्णय घेण्यासाठी अपिलार्थीचे प्रथम अपील पुन्हा जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग,नांदेड यांच्याकडे पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग,नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि.१७.०२.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत पुन्हा सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०९-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संभाजी हणमंत मुंढे,रा.मोहनाल, ता.चाकूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. निवृत्ती गणपती कांबळे, : अपिलार्थी
रा.शिवणी (बु.),ता.औसा, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्राचार्य,
डी.टी.एड.विद्यालय, लगसकर विद्यालय,लातूर
जन अपिलीय अधिकारी,
डी.टी.एड. बी.एन.लगसकर विद्यालय,लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१७०२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०९-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.०४.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १९.०५.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६.०७.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

अपिलार्थीने त्यांच्या दि. ११.०४.२०११ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये त्रयस्थ सौ.वैशाली दिलीपराव साबळे यांच्या हजेरीपटाच्या सत्यप्रती मागितल्या आहेत. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली किंवा कसे तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला किंवा

कसे याचा बोध होत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १९.०५.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील कलम ७(७) व ११ मधील तरतुदी विचारात घेऊन सुनावणी घेऊन त्रयस्थ पक्षाचे म्हणणे नोंदवून घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. ही बाब नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने व पारदर्शकता राखण्याकरिता जरुरी आहे.त्यानंतर त्रयस्थांची माहिती अपिलार्थीस देणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास माहिती देण्याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य./प्राथ.),जि.प.लातूर यांच्याकडे प्रकरण अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य./प्राथ.),जि.प.लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.१९.०५.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. निवृत्ती गणपती कांबळे,मु.पो.शिवणी (बु.),ता.औसा, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,डी.टी.एड.बी.एन.लगसकर विद्यालय,लातूर यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य./प्राथ.),जि.प.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद शफीख अहेमद पिता सय्यद मोहोमद, : अपिलार्थी
रा.उदगीर, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
शिक्षण विभाग (मा.),
जिल्हा परिषद, अकोला
जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (मा.),
जिल्हा परिषद, अकोला

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१७२४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सय्यद शफीख अहेमद पिता सय्यद मोहोमद | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अकोला | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अकोला- श्री. एस.एच.वाकोडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०९.०५.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०७.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अकोला यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.२४.०१.२०११ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये ध्येयपुर्ती शिक्षण संस्था,अकोला द्वारा संचलित सर्व शाळांची तसेच तामसी ता.बाळापूर,जि.अकोला येथील माध्यमिक शाळेच्या मान्यतेच्या प्रती अशी माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी सन २००२-०३ आहे. सदरची माहिती एका शिक्षण संस्थेच्या अंतर्गत सर्व शाळांबाबत विचारली असल्यामुळे ती अकोला तालुका,जिल्हा किंवा राज्य स्तरावरची माहिती मागितली आहे याबाबत जन माहिती अधिकारी यांना संभ्रम निर्माण झाला. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात असलेली माहिती संकलीत करण्याचा प्रयत्न करण्यात आला. दरम्यानच्या कालावधीत अपिलार्थीने मागितलेली माहिती ज्या संस्थेशी संबंधित असलेल्या तामसी येथील शाळेकडे अपिलार्थीने मागितलेली माहिती असणे शक्य आहे, असे अनुमान काढून, मुख्याध्यापक,कै.काशिराम पाटील विद्यालय,तामसी, ता.बाळापूर, जि.अकोला यांच्याकडे दि. १४.०२.२०११ रोजी अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज पाठविण्यात आला. त्याची प्रत अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी आयोगास सांगितले की, त्यांना यासंदर्भात कोणतेही पत्र प्राप्त झालेले नाही. आयोगाकडे द्वितीय अपील सुनावणीस लागल्यावर असे दृष्टीक्षेपात आले की, संबंधित शाळेकडून अपिलार्थीस माहिती देण्यात आलेली नाही. यामुळे आज माहिती सोबत आणली आहे. अपिलार्थी यांनी युक्तिवादात सांगितले की, त्यांना आजपर्यंत माहिती मिळालेली नाही व माहिती देण्यास विलंब झालेला आहे, याचा आयोगाने विचार करावा.

आयोगापुढे करण्यात आलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही शिक्षणाधिकारी (मा.),जि.प. अकोला यांच्याकडे मागितली असल्याने ती जिल्हयापुरती सीमित असणे शक्य आहे, असे समजणे आवश्यक होते. माहितीबाबत संभ्रम निर्माण झाल्यास अपिलार्थीस पत्रव्यवहार करुन झालेला संभ्रम दूर करुन माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी उचित कार्यवाही करणे योग्य ठरले असते. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी माहिती सुस्पष्ट मागितली असती तर माहिती देणे सोयीचे झाले असते. तसेच अपिलार्थी यांनी प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितल्याचेही दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांनी संबंधित मुख्याध्यापक यांना भविष्यात त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर विहित मुदतीत माहिती देण्याकरिता दक्ष राहावे, अशा सूचना देणे इष्ट राहील. त्याचप्रमाणे आयोगाच्या सूचनेप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी आज सोबत आणलेली माहिती हस्तांतरित केली. अपिलार्थी यांनी ती स्वीकारली.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद शफीख अहेमद पिता सय्यद मोहोमद, रा.खडकाळी गल्ली, पैगंबरपुरा,उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अकोला यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अकोला यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बागबंदे बस्वराज लिंगप्पा, : अपिलार्थी
रा.उदगीर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उदगीर,
जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१७३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग उदगीर, जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, जिल्हा लातूर - श्री. सं.गो. मुनगिलवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०३.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३.०५.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१.०७.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०७.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, जिल्हा लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.२५.०३.२०११ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये दि. ०१.०१.२००७ पासून मार्च,२०११ या कालावधीची मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाकडून प्राप्त निधी व कामाबाबत एकूण ७ मुद्यांवर विस्तृत माहिती मागितली आहे. सदरची माहिती संकलीत करुन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २६.०७.२०११ रोजी त्यांच्या कार्यालयातील सेवकामार्फत पाठविली.तथापि अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारण्यास नकार दिला.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढे करण्यात आलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब झालेला आहे. भविष्यात असा विलंब होणार नाही, याकरिता जन माहिती अधिकारी यांना दक्ष राहावे लागेल. त्याचप्रमाणे अपिलार्थीस आता पुन्हा ही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी, असे आयोगाचे निर्देश आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सा.बां.उपविभाग उदगीर,जि.लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बागबंदे बस्वराज लिंगप्पा, बसवनकेरी गल्ली, उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,

निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अतुल गवळे,कांबळे,चंद्रकांत,जाधव भागवत दगडू,सोनकांबळे मल्हारी,हणमंते गणेश किशनराव, रा.अहमदपूर, जि.लातूर : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, अहमदपूर,जि.लातूर जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, लातूर : उत्तरवादी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१७६० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जाधव भागवत दगडू, श्री. सोनकांबळे मल्हारी, श्री. गवळे अतुल | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय पोलीस अधिकारी, अहमदपूर, जि. लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर पोलीस अधीक्षक, लातूर - प्रतिनिधी - श्री. एस.आर.गोसावी, सहायक पोलीस निरीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६.०३.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०३.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०७.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास त्यांच्या दि. ०८.०९.२०११ रोजीच्या पत्राद्वारे गणेश महोत्सव बंदोबस्त असल्यामुळे ते सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहू शकत नसल्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती केली आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अतुल गवळे, कांबळे चंद्रकांत, जाधव भागवत दगडू, सोनकांबळे मल्हारी, हणमंते गणेश किशनराव, भाग्यनगर, कोर्टाच्या पाठीमागे, अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, अहमदपूर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बोमनाळे कोंडिबा वैजनाथ, : अपिलार्थी
रा.उदगीर, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३६७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बोमनाळे कोंडिबा वैजनाथ | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, डॉ.झाकीर हुसेन ऊर्दू व मराठी समांतर शाळा, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, लातूर- प्रतिनिधी - श्री. प्रवीण गायकवाड, अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक,लातूर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २४.१२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय कारणमिमांसेसह घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.),जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.),जिल्हा परिषद, लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.२४.१२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय कारणमिमांसेसह पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बोमनाळे कोंडिबा वैजनाथ,रक्षाळे निवास, तिरुपती सोसायटी, दुध डेअरी समोर, उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, डॉ.झाकीर हुसेन ऊर्दू व मराठी समांतर शाळा, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.),जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जाधव वसंत किशनराव, : अपिलार्थी
रा. लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक,
माध्यमिक श्री गणेश विद्यालय, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (मा.),
जिल्हा परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/५५१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जाधव वसंत किशनराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, श्री गणेश माध्यमिक विद्यालय, लातूर- श्री. सोमवंशी अशोक ज्ञानोबा | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, लातूर- प्रतिनिधी - श्री. आत्राम आर.जी.,कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६.०२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०५.२००८ (फेरसादर, दि.०१.०३.२०११) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. ०६.०५.२००८ रोजी द्वितीय अपील सादर केले आहे. त्यावर आयोगाने त्यांना दि. २९.११.२००८ रोजी त्रूटींची पूर्तता करण्याबाबत कळविलेले आहे. त्यावर प्रतिसाद दिलेला नाही. तथापि व्यक्तिशः विनंती केली असून अपील दाखल करुन घेण्यात येत आहे.

उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, याच माहितीसाठीच्या मूळ अर्जावर दि. १३.०९.२०११ रोजी अपील क्र. ५४९/११ या प्रकरणात आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठासमोर सुनावणी झालेली असून प्रकरणात आयोगाने निर्णय पारित केलेला आहे. या दोनही प्रकरणातील मूळ अर्ज एकसारखेच असल्यामुळे प्रस्तुत प्रकरण निष्प्रभ ठरत असून पुन्हा सुनावणी घेण्याची आवश्यकता आयोगास वाटत नाही, असे आयोगाचे अभिप्राय आहेत. ही बाब सुनावणीमध्ये सर्वांनी मान्य केली.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जाधव वसंत किशनराव, जाधव निवास, विवेकानंद पुरम परीमल शाळेच्या पूर्वेस, जुनी सुतगिरणी रोड, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री गणेश माध्यमिक विद्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.),जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आयनाले पदमाकर रामराव, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. आयनाले पदमाकर रामराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, लाल बहादूर शास्त्री प्राथमिक विद्यालय,लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, लातूर- प्रतिनिधी - श्री. प्रवीण गायकवाड, अधीक्षक, वेतन व भ.नि.नि.पथक, लातूर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०४.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी लालबहादुर शास्त्री प्राथमिक विद्यालय,शारदानगर,लातूर या शाळेतील चार त्रयस्थ शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता घेण्यासाठी तयार करण्यात आलेल्या संचिकेच्या टिपणीसह सत्यप्रती मागितल्या आहेत. माहितीप्रीत्यर्थ अपिलार्थीस दि. ०३.०२.२०११ रोजी एकूण ११२ पृष्ठे दिली आहेत.या संदर्भात अपिलार्थीने दिलेली पोच त्यांच्या अभिलेखामध्ये उपब्लध आहे .तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना ही माहिती मिळाली नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे संचिका उपलब्ध आहेत, असे जन अपिलीय अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले. उपलब्ध असलेल्या या संचिका माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीस पुन्हा पाहणीसाठी जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावे लागतील .अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.अशी कार्यवाही तीस दिवसांत होईल असे जन अपिलीय अधिकारी यांना पहावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आयनाळे पद्माकर रामराव, व्यंकटेशनगर, अंबाजोगाई रोड, ज्ञानशेष निवास, बालाजी मंदीरासमोर, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, लाल बहादूर शास्त्री प्राथमिक विद्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.),जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आयनाले पदमाकर रामराव,रा.लातूर : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१०२५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. आयनाले पदमाकर रामराव | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, लाल बहादूर शास्त्री प्राथमिक विद्यालय,लातूर | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, लातूर- प्रतिनिधी - श्री. प्रवीण गायकवाड, अधीक्षक, वेतन व भ.नि.नि.पथक,जि.प.लातूर | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.११.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९.०४.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने दि. ११.११.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जावर संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक यांनी माहिती दिलेली आहे, असे नमूद केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांना माहिती मिळाली आहे, तथापि त्यांना साक्षांकित स्वरुपामध्ये माहिती हवी आहे. तसेच पृष्ठ क्र.७०,७१ व २१ क्रमांकाची पृष्ठे नाहीत. ती देण्यात यावीत, अशी आयोगासमोर विनंती केली. यासाठी जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल. अशी कार्यवाही जन माहिती अधिकारी करतील असे जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना पहावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आयनाळे पद्माकर रामराव, व्यंकटेशनगर, अंबाजोगाई रोड, ज्ञानशेष निवास, बालाजी मंदीरासमोर, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, लाल बहादूर शास्त्री प्राथमिक विद्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.),जिल्हा परिषद, लातूर यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आयनाले पदमाकर रामराव, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१०२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. आयनाले पदमाकर रामराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, लाल बहादूर शास्त्री प्राथमिक विद्यालय,लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, लातूर- प्रतिनिधी - श्री. प्रवीण गायकवाड,अधीक्षक,वेतन व भविष्य निर्वाह निधी,लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०४.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. १४.१२.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये शैक्षणिक वर्ष २००४-०५ व २००७-०८ या कालावधीत लालबहादुर शास्त्री प्राथमिक शाळा, लातूर यांनी दाखल केलेल्या अनुदानाची प्रत मागितली आहे. शाळेने त्यांच्याकडे ओ.सी.उपलब्ध नाही, म्हणून माहिती देण्याचे नाकारले. ही माहिती जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.)यांच्या कार्यालयात उपलब्ध असू शकते. यास्तव जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा),जि.प.लातूर यांनी त्यांच्या कार्यालयात संबंधित मुख्याध्यापक यांना बोलावून अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावी, असे आयोगाचे निर्देश आहेत. यासाठी जन अपिलीय अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन पाहणीनंतर त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १३-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आयनाले पद्माकर रामराव, व्यंकटेशनगर, अंबाजोगाई रोड, ज्ञानशेष निवास, बालाजी मंदीरासमोर, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, लाल बहादूर शास्त्री प्राथमिक विद्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.),जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अंगद दामोधर गायकवाड, : अपिलार्थी
रा.तांदुळजा, ता.जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४४१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर - श्री. हराळे एस.एल | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जि.प.लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०३.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०४.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०६.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.१७.०३.२०११ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये ग्रामपंचायत तांदुळजा, ता.जि.लातूर या ग्रामपंचायतीसंदर्भात विविध विषयाबाबत एकूण ५ मुद्दे व अनेक उपमुद्यांद्वारे सन १९९९ ते २०००, ऑगस्ट, २००६, मार्च,२०१० व ऑक्टोबर, २०१० अशा विविध कालावधीची विस्तृत माहिती मागितली आहे.प्रसंगावशात जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या नजरेस आणून दिले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या कार्यालयास अशाच प्रकारचे सुमारे दहा अर्ज केले आहेत व या अर्जांद्वारे अशाच प्रकारची विविध माहिती मागितली आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये प्रश्नार्थक, लेखी स्वरुपात व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च)मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी ही बाब सुसंगत नाही. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देय होत नाही.या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे हे अपील या स्तरावर बंद करण्यात येत आहे. अपिलार्थी यांनी त्यांना आवश्यक असलेली माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात मागवावी असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अंगद दामोधर गायकवाड, रा.तांदुळजा, ता.जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख मुहम्मद खुर्रम अ.रशिदसाब, : अपिलार्थी
रा.निलंगा, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१५८७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद- श्री. एस.एन.जफर | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९.०२.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०५.०४.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३.०६.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की,अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित

केलेला नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०५.०४.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.०५.०४.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०९-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख मुहम्मद खुर्रम अ.रशिदसाब,छोटी मस्जिदजवळ, मु.पो.ता.निलंगा,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबादयांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. निवृत्ती गणपती कांबळे, : अपिलार्थी
रा.शिवणी (बु.), ता.औसा,
जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,औसा, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१७०१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. निवृत्ती गणपती कांबळे व त्यांचे प्रतिनिधी श्री. कांबळे जिवन सोपान | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - विस्तार अधिकारी (पं),पंचायत समिती, औसा,जि.लातूर-श्री. कुमठेकर एन.बी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - कृषि अधिकारी,पंचायत समिती, औसा,जि.लातूर- श्री. यमुलवाड एस.आर. | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी -गट विकास अधिकारी, पंचायत समिती,औसा, जि.लातूर - श्री.कदम पी.बी. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.०४.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९.०५.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०६.०७.२०११

सर्व उपास्थितांची बाजू ऐकून घेण्यात आली .

आयोगापुढे केलेल्या युक्तिवादावरुन आयोगाच्या असे निदर्शनास येत आहे की, अपिलार्थी यांनी जी माहिती मागितली आहे ती माहिती नेमकी खालीलप्रमाणे आहे.

१) ग्रामसेवक व गट विकास अधिकारी यांच्यामध्ये लोकवाटा बँकेतून उचलण्यासाठी झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती.

२) यशवंत ग्रामसमृध्दी योजना सुरु झाल्याची व बंद झाल्यासंदर्भात शासन परिपत्रकाची प्रत.

वरील मुद्दा १ मधील माहितीच्या सांक्षांकीत प्रति अपिलार्थीस देय होत आहेत. मुद्दा २ ची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे.तथापि ही छायाप्रत काढून अपिलार्थीस देण्यात यावी, असे आयोगाचे मत आहे.

३ ) तसेच औसा तालुक्यातील मंजूर शेततळयांबाबत मोघम व विस्तृत स्वरुपाची माहिती अपिलार्थी यांनी मागितली आहे असे दिसून येत आहे . पंचायत समितीच्या कक्षेत १०० शेततळे असतील, असे आयोगास जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. यातील नेमक्या कोणत्या शेततळयाची माहिती त्यांना आवश्यक आहे, अशी विचारणा आयोगाने केली असता यावर शिवणी बु. व किल्लारी या दोन गावातील शेततळयांच्या प्रस्तावाची प्रत व झालेल्या खर्चाचा तपशील एवढाच अपिलार्थी यांना हवा असल्याचे त्यांनी सुनावणीमध्ये प्रतिपादन केले.

सदरची माहिती पंचायत समिती स्तरावर उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे ती अपिलार्थीस देण्यात यावी. या कार्यवाहीस अधिक विलंब होणार नाही,याची दक्षता जन माहिती अधिकारी यांनी घ्यावी, असे आयोगाने सुचित केले .

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. निवृत्ती गणपती कांबळे,रा.शिवणी (बु.), ता.औसा,जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं),पंचायत समिती, औसा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,पंचायत समिती, औसा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औसा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. निवृत्ती गणपती कांबळे,<br>रा.शिवणी (बु.), ता.औसा,<br>जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, शिवणी (बु.),<br>ता.औसा, जि.लातूर<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, औसा, जि.लातूर | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१७०३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. निवृत्ती गणपती कांबळे व त्यांचे प्रतिनिधी श्री. कांबळे जिवन सोपान | : | उपस्थित |
| ३.२ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, शिवणी (बु.), पं.स.औसा,जि.लातूर- श्री. निलासुरे पी.एम. | : | उपस्थित |
| ३.३ | सध्याचे जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, शिवणी (बु.), पं.स.औसा,जि.लातूर- श्रीमती गव्हाणे बी.पी. | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औसा, जि.लातूर- श्री. कदम पी.बी. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.०४.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २५.०४.२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९.०५.२०११ |

७ अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख -

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०६.०७.२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, सध्याचे व तत्कालीन जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की,अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये ग्रामपंचायत शिवणी बु.शी संबंधित विविध मुद्यांवर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन ग्रामसेवक यांनी अपिलार्थीस दि. २५.०४.२०११ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन कळविले आहे की, माहितीची त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून पाहणी करावी. अपिलार्थी यांनी यावर प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती विचारात घेता तसेच छायाप्रती करण्यासाठी ग्रामपंचायतीकडे निधी उपलब्ध नसल्याकारणाने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) अन्वये अपिलार्थीस माहितीची पाहणी देण्याची कार्यवाही योग्य आहे. या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पुन्हा एकदा पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी पुन्हा एकदा अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कांबळे निवृत्ती गणपती, मु.पो. शिवणी (बु.),ता.औसा, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,शिवणी (बु.), पं.स.औसा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औसा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बुजारे अर्जुन ओंकार, : अपिलार्थी
रा.ढाळेगाव,ता.अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, अहमदपूर,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१७०६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बुजारे अर्जुन ओंकार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०५.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २८.०६.२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०६.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२.०६.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०७.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची गंभीर दखल आयोग घेत आहे. यापुढे आयोगाकडील प्रत्येक सुनावणीस ते उपस्थित राहतील याची त्यांनी दक्षता घ्यावी.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, दि. ०२.०५.२०११ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये सन १९९९ ते २००५ या कालावधीमध्ये तयार करण्यात आलेल्या सिमेंट काँक्रीट रस्त्याबाबतची माहिती मागितली आहे. त्या माहितीची पाहणी

त्यांना देण्यात आली. तशी माहितीची पाहणी त्यांनी घेतली तथापि त्यांना आवश्यक ती कागदपत्रे मिळालेली नाहीत. त्यांना खालील माहितीची आवश्यकता आहे.

१) शिवाजी चौक ते मच्छिंद्र रघुनाथ शेकडे या रस्त्याची मोजमापपुस्तिका व अंदाजपत्रकाची प्रत.

२) शिवाजी चौक ते नारायणजी अप्पा महाराज मंदीर या लांबीच्या सिमेंट कॉंक्रीट रस्त्यांच्या अंदाजपत्रकाची प्रत.

ही माहिती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वर नमूद केलेली माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बुजारे अर्जुन ओंकार, द्वारा बुजारे अजयकुमार ओंकार,
मु.पो.ढाळेगाव,ता.अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग,
अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. जाधव वसंत किशनराव,<br>जाधव निवास, विवेकानंद पुरम परीमल शाळेच्या पूर्वेस, जुनी सुत गिरणी रोड, लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>श्री. सचिव, ज्ञानदिप शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/५४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जाधव वसंत किशनराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>श्री. सचिव, ज्ञानदिप शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर<br>- श्री. अशोक ज्ञानोबा सोमवंशी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर<br>- प्रतिनिधी - श्री. आत्राम आर. जी., क. अ. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४-१२-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६-०२-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०५-२००८<br>फेरसादर दिनांक<br>०१-०३-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थी यांनी ज्ञानदिप शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेकडील सभासदांची सन १९९५-१९९६ ची यादी मागितली आहे. या संस्थेस शासनाचे कोणतेही अनुदान मिळत नाही.

मा. उच्च न्यायालय, मुंबईच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन नं. ५२९४/२००८, मुख्य विश्वस्त श्री. गोविंद रामानंद सद्गुरु प्रल्हाद महाराज संस्थान, साखरखेर्डा, जिल्हा बुलढाणा विरुध्द राज्य माहिती आयोग, नागपूर यांच्यासंदर्भात खाजगी संस्था ज्यांना शासनाचे अनुदान मिळत नाही त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही असा निर्णय दिला आहे त्यामुळे माहिती देण्याची जबाबदारी ज्ञानदिप शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर या संस्थेची नाही. परंतु सभासदांची सदर यादी धर्मादाय आयुक्तांकडे असू शकते. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये माहितीच्या केलेली व्याख्येनुसार जी माहिती खाजगी यंत्रणेकडून सार्वजनिक प्राधिकरणास अस्तित्वातील कायद्यानुसार प्राप्त होऊ शकते ती 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येत मोडते याकरिता धर्मादाय आयुक्तांकडून अपिलार्थीस ही माहिती उपलब्ध होऊ शकते. अपिलार्थीने धर्मादाय आयुक्तांच्या जन माहिती अधिका-याकडे याकरिता अर्ज करावा.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जाधव वसंत किशनराव, जाधव निवास, विवेकानंद पुरम परीमल शाळेच्या पूर्वेस, जुनी सुत गिरणी रोड, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा श्री. सचिव, ज्ञानदिप शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. जाधव वसंत किशनराव,<br>जाधव निवास, विवेकानंद पुरम परीमल शाळेच्या पूर्वेस, जुनी सुत गिरणी रोड, लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, श्री. गणेश माध्यमिक विद्यालय, लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/५४९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जाधव वसंत किशनराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, श्री. गणेश माध्यमिक विद्यालय, लातूर<br>- श्री. अशोक ज्ञानोबा सोमवंशी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर<br>- प्रतिनिधी - श्री. आत्राम आर. जी. (क. अ.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१-१२-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६-०२-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०५-२००८<br>फेरसादर दिनांक<br>०१-०३-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जान्वये ज्ञानदिप शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचलित श्री गणेश विद्यालयातील संबंधित वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार मंजूर झालेल्या एकूण सर्व कर्मचा-यांच्या नेमणुका संदर्भातील १९९५ ते २००७-०८ पर्यंतच्या सेवाजेष्ठता यादीचा तपशील मागितला आहे. ही माहिती त्यांच्या पुत्राने वेगळ्या अर्जान्वये मागितली होती ती देण्यात आली परंतु अपिलार्थीस माहिती देण्यावरुन संभ्रम निर्माण झाला. आज रोजी त्यांच्याकडे माहिती उपलब्ध आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना आतापर्यंत माहिती मिळाली नाही. त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे प्रथम अपील सादर केले तथापि त्यावर सुनावणी झालेली नाही त्यामुळे त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील सादर केलेले आहे व त्यांना माहिती मिळावी अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीचे व्दितीय अपील दिनांक ०६-०५-२००८ रोजीचे आहे त्यावर आयोगातर्फे दिनांक २९-११-२००८ रोजी त्रुटीची पुर्तता करण्याकरिता अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी आयोगास केलेल्या विनंतीनुसार त्यांचे व्दितीय अपील विशेष बाब म्हणून सुनावणीस घेण्यात आले आहे. जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आयोगास मान्य नाही. भविष्यात त्यांना प्रत्येक माहिती अर्ज स्वतंत्रपणे हाताळून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत माहिती देणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही ही बाब आयोगास गंभीर वाटते आणि त्याची दखल आयोगाने घेतली आहे.

आज रोजी आयोगाने सूचित केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे असलेला माहितीचा एक संच अपिलार्थीस देण्यात आला. अपिलार्थी यांना आज रोजी माहिती मिळाली असल्याकारणाने त्यांनी माहितीची पाहणी करावी व त्यांना नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे ही बाब त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जाधव वसंत किशनराव, जाधव निवास, विवेकानंद पुरम परीमल शाळेच्या पूर्वेस, जुनी सुत गिरणी रोड, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. गणेश माध्यमिक विद्यालय, पोच्चम्मा गली, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. जाधव वसंत किशनराव,<br>जाधव निवास, विवेकानंद पुरम, परीमल शाळेच्या पूर्वेस, जुनी सुत गिरणी रोड, लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/५५० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जाधव वसंत किशनराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, श्री. गणेश माध्यमिक विद्यालय, लातूर<br>- श्री. अशोक ज्ञानोबा सोमवंशी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर<br>- प्रतिनिधी - श्री. आत्राम आर. जी. (क. अ.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९-११-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६-०२-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०५-२००८<br>फेरसादर दिनांक ०१-०३-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकाारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. गणेश माध्यमिक विद्यालय, लातूर यांनी माहितीबाबतची सद्यस्थिती अवगत करुन देण्यासाठी आयोगास सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती केली. जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येऊन सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जाधव वसंत किशनराव, जाधव निवास, विवेकानंद पुरम, परीमल शाळेच्या पूर्वेस, जुनी सुत गिरणी रोड, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. गणेश माध्यमिक विद्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बोमनाळे कोंडिबा वैजनाथ, | : | अपिलार्थी |
| | मु. पो. रसाळे निवास, तिरुपती सोसायटी, दुध डेअरी समोर, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | शिक्षण उप संचालक, विभागीय शिक्षण उप संचालक कार्यालय, लातूर | | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/६१५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बोमनाळे कोंडिबा वैजनाथ | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : | उपस्थित |
| | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | | |
| | - प्रतिनिधी - श्री. आत्राम आर. जी., क. अ. | | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | उपस्थित |
| | शिक्षण उप संचालक, विभागीय शिक्षण उप संचालक कार्यालय, लातूर - प्रतिनिधी - श्री. जरगर एस.एच., शिक्षण विस्तार अधिकारी | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८-१२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २८-१२-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २७-०१-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०३-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत याची गंभीर दखल आयोग घेत आहे. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बोमनाळे कोंडिबा वैजनाथ, मु. पो. रसाळे निवास, तिरुपती सोसायटी, दुध डेअरी समोर, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उप संचालक, विभागीय शिक्षण उप संचालक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अनंत गोविंदराव पारसेवार,<br>गोविंदराज प्रिंटर्स, रेल्वेस्टेशनजवळ, उदगीर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर,<br>जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३९६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अनंत गोविंदराव पारसेवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर,<br>जिल्हा लातूर - सौ. यु. पी. बिरादार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर<br>- प्रतिनिधी - श्री. पाटील बी. एस. (क. अ.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४-०२-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०९-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०६-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०४-०२-२०११ च्या माहिती अर्जान्वये सन २००७ ते २०१० या कालावधीतील दोन मुद्दयांची माहिती मागितली आहे. त्यातील मुद्दा क्रमांक एक मध्ये उदगीर तालुक्यात किती गावे तंटामुक्त म्हणून घोषित झाली आहेत त्यांची यादी व त्यांच्या कार्यालयाला मिळालेल्या पुरस्काराची रक्कम याबाबतची माहिती मागितली आहे व दुस-या मुद्दयाच्या संबंधात रकमेचा विनियोग ग्रामपंचायतीने कसा केला याचा तपशील मागितला आहे. यापूर्वीच्या एका अर्जान्वये सन २००९ - २०१० ची गावांची यादी व देण्यात आलेली रक्कम याची माहिती अपिलार्थीस देण्यात आलेली आहे व उर्वरीत सन २००७-२००८ व २००८-२००९ ची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. ही माहिती पोलीस अधीक्षक, लातूर यांच्याकडे उपलब्ध आहे. तसेच पुरस्कार मिळालेल्या ग्रामपंचायतींना त्या पुरस्काराचा विनियोग करण्याचा संपूर्ण अधिकार आहे त्यामुळे त्याचे व्हावचर इत्यादीचा तपशील त्यांच्याकडे उपलब्ध नाही. तो ग्रामपंचायतकडे उपलब्ध असतो त्यामुळे सर्व ग्रामपंचायतींना अपिलार्थीस माहिती देण्याकरिता कळविण्यात आले असून त्याच्या प्रती अपिलार्थीस दिलेल्या आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, मागितलेल्या माहिती अर्जामध्ये त्यांना सन २०१० ची माहिती मिळाली आहे ती बाब खरी आहे. तथापि उर्वरीत सन २००७-२००८ व २००८-२००९ ची माहिती त्यांच्याकडे नाही ही बाब कळविणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे सर्व ग्रामपचायतींना त्यांनी पत्र लिहिले आहे. त्यातील किती गावे तंटामुक्त आहे त्यांना कळविणे आवश्यक होते ती माहिती आजपर्यंत त्यांना मिळालेली नाही. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर यांना अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय द्यावा असे कळविले आहे तथापि गट विकास अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दोन मुद्‌दयावर माहिती मागितली आहे,त्यातील पहिल्या मुद्दयावर २००७-०८, २००८-२००९ व २००९-१० या वर्षाची फक्त गावांची यादी व त्यांना दिलेली रकम मागितली आहे. त्यातील सन २००९-२०१० ची याबाबतची माहिती अपिलार्थीस दिलेली आहे. उर्वरीत दोन वर्षाची माहिती जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर यांच्याकडे उपलब्ध नाही. या दोनही बाबी विहित मुदतीत कळविणे आवश्यक होते त्याच्रमाणे मुद्दा क्रमांक दोनची माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. तंटामुक्त गावांच्या मिळालेल्या रकमेच्या विनियोगासाठी संबंधित ग्रामपंचायत सक्षम आहेत. ही माहिती ग्रामपंचायत-कडे उपलब्ध आहे तेथे ग्रामसेवक हे जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केलेले आहे. त्यांच्या-कडे मागणी केल्यास एकापेक्षा जास्त माहिती अधिकारी असल्यास माहितीचा अर्ज माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (३) नुसार सर्व ग्रामसेवकाकडे वर्ग करणे उचित ठरत नाही. ही बाब जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर यांनी केलेली आहे. अपिलार्थीस ही बाब कळवून सन २००९-१० या वर्षाची तंटामुक्त गावाची यादी कळविली आहे. उदगीर तालुक्यातील सन २००९-१० वर्षी पात्र तंटामुक्त झालेली गावे १. लोहारा, २. मलकापूर, ३. देवर्जन, ४. नागलगाव, ५. डिग्रस, ६. वायेगाव, ७. शेल्लाळ, ८. वाडवणा (बु.) व ९. हंडरगुळी अशी आहेत. अपिलार्थी यांनी या गावाचे ग्रामसेवक तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी करणे योग्य ठरते.

या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर यांनी अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत सन २००७-२००८व २००८-२००९ ची माहिती पोलीस अधीक्षक, लातूर यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे ही बाब अपिलार्थीस कळवावी. तसेच अपिलार्थी यांनी माहितीच्या अर्जान्वये माहिती मिळण्याच्या दृष्टीने व्यवहार्य भूमिका अंमलात आणणे आवश्यक आहे म्हणून त्यांनी उर्वरीत माहिती मिळण्याकरिता पोलीस अधीक्षक कार्यालयाशी संपर्क साधून

तंटामुक्त गावांबाबतच्या माहितीची मागणी करणे योग्य ठरेल असे आयोगाचे मत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर यांना संबंधित अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय द्यावा लागेल असे कळविले आहे तथापि अद्यापही त्यांनी सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. याची चौकशी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी करणे योग्य ठरते. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहितीबाबत स्पष्टपणे अपिलार्थीस पंधरा दिवसाच्या आत कळवावे व अपिलार्थी यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा वेगळा अर्ज करावा.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर यांना प्रथम अपिलावर सुनावणी घेण्याचे आदेशित करुनही सुनावणी का घेण्यात आली नाही याची चौकशी करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनंत गोविंदराव पारसेवार, गोविंदराज प्रिंटर्स, रेल्वेस्टेशनजवळ, उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बोमनाळे कोंडिबा वैजनाथ,<br>मु. पो. रसाळे निवास, तिरुपती सोसायटी, दुध डेअरी समोर, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य, श्री. नृसिंह माध्यमिक विद्यालय, अंकुलगा (राणी), तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४२४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बोमनाळे कोंडिबा वैजनाथ | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य, श्री. नृसिंह माध्यमिक विद्यालय, अंकुलगा (राणी), तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर<br>- प्रतिनिधी - श्री. आत्राम आर. जी. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०९-०५-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१-०२-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०-०४-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०६-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे दोघेही सुनावणीस अनुपस्थित आहेत याची गंभीर दखल आयोग घेत आहे. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बोमनाळे कोंडिबा वैजनाथ, मु. पो. रसाळे निवास, तिरुपती सोसायटी, दुध डेअरी समोर, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, श्री. नृसिंह माध्यमिक विद्यालय, अंकुलगा (राणी), तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सय्यद शफीख अहेमद पिता सय्यद मोहोमद,<br>रा. खडकाळी गल्ली, पैगंबरपुरा, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>शिक्षण विभाग (मा.), जिल्हा परिषद, सोलापूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१७२५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर<br>- श्री. मुजावर मदारगनी सैय्यदसाहेब | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०९-०५-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०७-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये सुप्रभात शिक्षण प्रसारक मंडळ, सोलापूर व्दारा संचलित बालभारती माध्यमिक विद्यालय, सोलापूर या शाळेची माहिती

मागितली आहे. या माहितीचा कालावधी सन २००२-२००३ असा आहे. अपिलार्थीस ही माहिती दिनांक ०९-०९-२०११ रोजी देण्यात आली आहे व त्याची पोच त्यांच्या दप्तरी दाखल आहे.

आज रोजी अपिलार्थी यांचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक १०-०९-२०११ रोजीचे पत्र आयोगासमोर आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती मिळाली असून त्यांचे समाधान झालेले आहे. तरी सदरचे अपील निकाली काढण्यात यावे. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद शफीख अहेमद पिता सय्यद मोहोमद, रा. खडकाळी गल्ली, पैगंबरपुरा, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बावगे उमाकांत विश्वनाथ,<br>रा. वंजारवाडी, पो. वायगांव, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, दवणहिप्परगा,<br>तालुका देवणी, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, देवणी, जिल्हा लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१७६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, दवणहिप्परगा, तालुका देवणी, जिल्हा लातूर<br>- श्री. पठाण बी. जी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, देवणी, जिल्हा लातूर - श्री. मांदळे ए. व्ही. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-०७-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये नमुना नंबर ८ व ९ च्या रजिस्टरची माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी १९८६ ते २०१० असा चोवीस वर्षांचा आहे. सदरची माहिती संकलीत करण्यास काही कालावधी लागला. जन माहिती अधिकारी यांनी दोन महिन्यापूर्वीच कार्यभार हाती घेतला आहे व आज रोजी माहिती तयार करुन आणली आहे. ते ती अपिलार्थीस देऊ शकतात.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी-च्या प्रथम अपिलावर सुनावणी घेण्यासाठी त्यांना दोन वेळेस कळविण्यात आले. तथापि पोस्टाचे पाकीट परत आले आहे. त्यामुळे त्यावर सुनावणी घेण्यात आलेली नाही

अपिलार्थी अनुपस्थित आहेत तथापि त्यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये माहिती अद्याप मिळालेली नाही असे नमूद केलेले आहे. तरी जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, दवणहिप्परगा, तालुका देवणी, जिल्हा लातूर यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली एकूण १७ पृष्ठांची माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पाठवावी. अपिलार्थी यांनी माहिती प्राप्त झाल्यावर त्या माहितीची पाहणी करावी व त्यांना नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे ही बाब त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बावगे उमाकांत विश्वनाथ, रा. वंजारवाडी, पो. वायगांव, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, दवण-हिप्परगा, तालुका देवणी, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, देवणी, जिल्हा लातूर

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सतिश त्र्यंबकराव पाटील,<br>मु. पो. वडगांव, पो. शिवणी (को), तालुका निलंगा,<br>जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१८८२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर<br>- प्रतिनिधी - श्री. आत्राम आर. जी., कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर - प्रतिनिधी - श्री. जरगर एस.एच., शिक्षण विस्तार अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३-०३-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०५-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०-०६-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०७-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये संपूर्ण लातूर जिल्हयातील झालेल्या वैयक्तिक मान्यता शिबिराबाबतची मोघम व विस्तृत अशी सन २०१० ते २०११ या कालावधीमधील माहिती मागितली आहे. यामध्ये शाळेचे प्राप्त झालेले प्रस्ताव, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वैयक्तिक मान्यतेच्या प्रती, मान्यता प्रस्ताव, आरक्षण तक्ता, टिपणी इत्यादीची सविस्तर माहिती मागितली आहे. सदरची माहिती मोघम स्वरुपाची आहे तसेच संकलीत करण्यास वेळ लागणार असल्याने कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीची पाहणी देण्यात येईल असे दिनांक ११-०४-२०११ रोजी कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत कळविले आहे अपिलार्थीने त्यावर प्रतिसाद दिलेला नाही.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यांच्या दिनांक २०-०७-२०११ च्या व्दितीय अपिलावरुन त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही असे दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये अपिलार्थी यांनी मागितलेली व त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०९-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सतिश त्र्यंबकराव पाटील, मु. पो. वडगांव, पो. शिवणी (को), तालुका निलंगा, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अंकुश बापुराव आंबेकर,<br>रा. कोळपा, पो. कासारखेडा, तालुका जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३१४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर<br>- श्री. एस. ए. हराळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर<br>- प्रतिनिधी - श्री. पाटील बी. एस., क. अ. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०९-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-१०-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | ०४-११-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०१-२००९<br>फेरसादर दिनांक<br>१०-०८-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती प्रथमतः दिनांक १७-११-२००८ रोजी देण्यात आली आहे व त्याची पोच त्यांच्या दप्तरी दाखल आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्यानंतर पुन्हा अपिलार्थीस दिनांक ३०-१०-२००९ रोजी माहिती दिली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपिलावर त्रुटींची पुर्तता करण्याकरिता दिनांक २२-१२-२००९ रोजी त्यांना कळविण्यात आले असे आयोगाकडील कागदपत्रावरुन दिसून येत आहे. तथापि त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही. अपिलार्थी यांनी विनंती केल्यानुसार त्यांचे अपील विशेष बाब म्हणून सुनावणीस घेण्यात आले आहे. त्यांनी आज रोजी सुनावणीस उपस्थित राहणे आवश्यक होते तथापि ते उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थी यांना माहिती मिळाली आहे तथापि त्यांना चुकीची व अर्धवट माहिती मिळाली आहे असे त्यांच्या दिनांक १९-०१-२००९ च्या व्दितीय अपिलावरुन दिसून येत आहे. याकरिता अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती अर्धवट किंवा चुकीची मिळाली आहे ही बाब त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०९-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अंकुश बापुराव आंबेकर, रा. कोळपा, पो. कासारखेडा, तालुका जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. संजय तुकाराम पवार,<br>रा. हडळतो, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/६०८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संजय तुकाराम पवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर - श्री. कांबळे के. एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष : चेअरमन, गुरुदत्त दुध सेवा सोसायटी, हडोळती स्वस्त धान्य दुकान | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६-०८-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-११-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८-१२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०३-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये ०१ एप्रिल २००७ ते ३० जून २०१० या कालावधीतील केरोसीन वाटपाबाबतची त्रयस्थ दुकानदाराकडून पावती पुस्तक, केरोसीन वाटप इत्यादीबाबतची व त्याचप्रमाणे बीपीएल, अंतोदय, अन्नपूर्णा, ए. पी. एल. लाभधारकास देण्यात येणा-या गहू, तांदुळ, साखर इत्यादी वाटपाबाबतची एकूण पाच मुद्दयावर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती विचारात घेता असे दिसून येते की, पाच मुद्दयावरील माहिती तहसील कार्यालयात उपलब्ध आहे व ती ते देऊ शकतात व या माहितीच्या झेरॉक्स काढण्याकरिता रुपये ८४,०७८ इतक्या निधीची आवश्यकता लागेल. ही बाब दिनांक १६-०८-२००९ रोजी अपिलार्थीस कळविली आहे. त्रयस्थांकडील माहिती वगळता त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली ८० पृष्ठांची उर्वरीत माहिती अपिलार्थीस देणे शक्य होते असे दिसून येते. ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य नोंदणीकृत टपालाने पाठवावी लागेल.

त्याचप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर व या प्रकरणाशी संबधित कर्मचारी / अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे त्यांना एकत्रित रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार ) इतकी शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा आयोगास कलम २० (१) च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी, लातूर यांच्यामार्फत सादर करावा लागेल. संबंधित जन माहिती अधिकारी यांना ही नोटीस तामीली करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी, लातूर यांची राहील. त्याचप्रमाणे अर्जदारास त्रयस्थंच्या मागितलेल्या माहितीकरिता शुल्काचा भरणा प्राप्त झाल्यावर माहिती देण्यात येईल असे दिनांक १६-०८-२०१० रोजी कळविले आहे. त्यातील सदरची माहिती पाहण्यासाठी देण्यात येईल असेही कळविले आहे. याकरिता आता जी माहिती उपलब्ध आहे त्याची पाहणी अपिलार्थीस देण्यात यावी. त्रयस्थांनी त्यांच्याकडील माहिती गहाळ झाली असल्याचे कळविल्याचे दिसून येत आहे. त्यातील माहिती उपलब्ध होती त्यावेळी दाखविणे इष्ट झाले असते. याकरिता माहिती गहाळ होण्याच्यासंदर्भात जिल्हाधिकारी, लातूर यांना स्वतः चौकशी करुन त्याच्या सत्यअसत्येबाबतची पडताळणी करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर व या प्रकरणाशी संबधित कर्मचारी / अधिकारी यांना विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे एकत्रित रुपये २५०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगास आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी, लातूर यांच्यामार्फत सादर करावा.

३ जिल्हाधिकारी, लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे स्वस्त धान्य दुकानदाराकडील कागदपत्रे गहाळ होण्यासंदर्भातील प्रकरणाची चौकशी करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय तुकाराम पवार, रा. हडळतो, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. संजय तुकाराम पवार,<br>रा. हडळतो, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/६१० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संजय तुकाराम पवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर - श्री. कांबळे के. एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष : श्री. अभिनव शिवराम पवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०-१०-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-११-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८-१२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०३-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थी यांनी दिनांक २३-०९-२०१० च्या माहिती अर्जान्वये एकूण पाच मुद्दयावर दिनांक ०१ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००९ या कालावधीतील विस्तृत माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. त्यातील मुद्दा क्रमांक २ व ३ ची माहिती किरकोळ रॉकेल विक्रेते, हडोळती यांच्याकडील आहे व मुद्दा क्रमांक १ ची माहिती तहसील कार्यालयात उपलब्ध होऊ शकते. तहसील कार्यलयाकडे उपलब्ध असलेली माहिती देणे शक्य होते तथापि ती अद्यापपर्यंत देण्यात आलेली दिसून येत नाही. तरी सदरची माहिती अपिलार्थीस विनामूल्य नोंदणीकृत टपालाने देण्याची व्यवस्था तहसीलदार, अहमदपूर यांना करावी लागेल. त्याचप्रमाणे त्रयस्थाकडे असलेली संबंधित माहिती गहाळ झाली आहे व ती उपलब्ध होताच देण्यात यावी असा जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेतला आहे. त्रयस्थ स्वस्त धान्य दुकानासंदर्भातील कागदपत्रे गहाळ होण्याची प्रकरणे आयोगाच्या नजरेस ब-याच वेळा आलेली आहेत ही बाब आयोगास गंभीर वाटते. याकरिता जिल्हाधिकारी, लातूर यांनी सदर प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन चौकशी करणे आवश्यक ठरत आहे. संबंधित दुकानदार यांची चौकशी करुन त्यांनी योग्य ती कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस विहित मुदतीत त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती न देण्याचा प्रमाद घडला आहे. त्याकरिता संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर व या प्रकरणाशी संबधित कर्मचारी / अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे त्यांना एकत्रित रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार ) इतकी शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा आयोगास कलम २० (१) च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी, लातूर यांच्यामार्फत सादर करावा लागेल. संबंधित जन माहिती अधिकारी यांना ही नोटीस तामीली करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी, लातूर यांची राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. तहसीलदार, अहमदपूर, जिल्हा लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर व या प्रकरणाशी संबधित कर्मचारी / अधिकारी यांना विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे एकत्रित रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार ) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगास, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी, लातूर यांच्यामार्फत सादर करावा.

३. जिल्हाधिकारी, लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे स्वस्त धान्य दुकानदारांकडील कागदपत्रे गहाळ होण्यासंदर्भातील प्रकरणाची चौकशी करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय तुकाराम पवार, रा. हडळतो, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संभाजी हणमंत मुंढे, : अपिलार्थी
रा. मोहनाल, तालुका चाकूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्राचार्य, महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर,
जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
विभागीय शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१६९० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य, महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर - डॉ. बगडे जी. डी. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड<br>- प्रतिनिधी - श्री. दीपक देशपांडे, लघुलेखक उच्च श्रेणी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४-०२-२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०७-०५-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५-०७-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी त्यांच्या महाविद्यालयात कार्यरत नव्हते त्यामुळे त्यांनी मागितलेली सहा मुद्दयावरील माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही

व देता येत नाही असे अपिलार्थीस दिनांक २४-०२-२०११ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत कळविण्यात आले आहे. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक ०७-०५-२०११ रोजी निर्णय घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती योग्य असल्याचे दिसून येत आहे त्यामुळे अपिलार्थी यांनी संबधित संस्थेकडे संपर्क करावा असे कळविले आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहेत.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संभाजी हणमंत मुंढे, रा. मोहनाल, तालुका चाकूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. निलेश अशोकराव हिप्पलगावकर,<br>श्याम सोसायटी, रामनगर, देगलूर रोड, उदगीर,<br>जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१७३० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. निलेश अशोकराव हिप्पलगावकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर - श्री. क्षीरसागर व्ही. व्ही. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-०४-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०५-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०७-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली आहे तथापि ती अनावश्यक आहे. त्यांना मागितलेली माहिती मिळाली नाही व त्यांना खालीलप्रमाणे माहिती अपेक्षित आहे.

१. उदगीर तालुक्यामध्ये २८०२ शिधापत्रिका तपासणीअंती बोगस ठरल्या आहेत. ज्या शिधापत्रिका रद्द ठरवून पुरवठा विभागाने स्वस्त धान्य दुकानदारावर गुन्हे दाखल झाले आहे. या शिधापत्रिकावर रॉकेल उचलले गेले असल्यास त्याची माहिती पाहिजे. अपिलार्थीने माहितीचा कालावधी मे २०१० ते जानेवारी २०११ असा दिला आहे.

२. रॉकेलचा दर याबाबतची माहिती.

सदरची माहिती ज्या प्रकारे उपलब्ध आहे ती अपिलार्थीस देण्याची व्यवस्था करावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १४-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. निलेश अशोकराव हिप्पलगावकर, श्याम सोसायटी, रामनगर, देगलूर रोड, उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अनंत गोविंदराव पारसेवार,<br>गोविंदराज प्रिंर्टस, रेल्वेस्टेशनजवळ, उदगीर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१७३९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अनंत गोविंदराव पारसेवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर - श्री. व्ही. व्ही. क्षिरसागर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९-०३-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५-०४-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०७-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-०४-२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-०४-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनंत गोविंदराव पारसेवार, गोविंदराज प्रिंटर्स, रेल्वेस्टेशनजवळ, उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. काझी अनुसईद लियाकत अली,<br>कादरी नगर, औसा, तालुका औसा, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, औसा, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, औसा, जिल्हा लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१८५० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. काझी अनुसईद लियाकत अली | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, औसा, जिल्हा लातूर - व्ही. एस. कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, औसा, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४-०२-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २८-०३-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३-०४-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२-०७-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०७-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, लातूर जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदारांची वाटपाबाबतची कार्यपध्दती, अन्नधान्य, केरोसीन व इतर जीवनावश्यक बाबीसंदर्भात

एकूण सहा मुद्दयावर माहिती मागितली आहे. त्यांना माहिती विलंबाने प्राप्त झाली आहे व त्या माहितीमध्ये बरीच माहिती अपूर्ण आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांच्या दिनांक १४-०२-२०११ च्या माहिती अर्जावर दिनांक २८-०३-२०११ रोजी त्यांना प्रथम प्रतिसाद देऊन उपलब्ध असलेली माहिती देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे मुद्दा क्रमांक ४ व ५ ची माहिती स्वस्त धान्य दुकानदारांकडे असल्यामुळे त्यांच्याशी संपर्क साधून अपिलार्थी यांनी माहिती घ्यावी असे कळविण्यात आले आहे व दिनांक ०४-०७-२०११ रोजी त्याचप्रमाणे आपणास माहिती हवी असेल तर कार्यालयात उपस्थित राहून हस्तगत करावी असे कळविण्यात आले आहे. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औसा, जिल्हा लातूर यांच्याकडे अपिलार्थीने प्रथम अपील दाखल केले. त्यावर त्यांनी दिनांक १२-०७-२०११ रोजी सुनावणी घेऊन माहिती तात्काळ विनामूल्य द्यावी असा निर्णय दिला आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मोघम व त्याचप्रमाणे मुद्दा क्रमांक १, २ व ३ ची माहिती ही तक्ता देऊन तक्त्यामध्ये मागितली आहे. जी माहिती उपलब्ध आहे ती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार देय आहे. जन माहिती अधिकारी यांनी तक्त्यामध्ये माहिती तयार करुन देणे अभिप्रेत नाही. तरी जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली उर्वरीत मुद्दयावरची माहिती तहसील कार्यालयाकडे उपलब्ध असण्याची शक्यता आहे. त्याची पाहणी करावी लागेल. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-०३-२०११ च्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले आहे की, मुद्दा क्रमांक ४, ५ व ६ ची माहिती स्वस्त धान्य दुकानदाराकडून हस्तगत करावी. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. स्वस्त धान्य दुकानदार हे त्रयस्थ आहेत जन माहिती अधिकारी नव्हेत त्यामुळे त्यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेणे कळविणे अपेक्षित नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या मूळ अर्जामधील माहिती एकत्रित करुन ती अपिलार्थीस देण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, औसा यांची आहे. अपिलार्थी यांना माहिती मिळाली आहे. तथापि अपूर्ण मिळाली आहे ही बाब विचारात घेता जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी. ही प्रक्रिया एक महिन्यात पूर्ण होईल याची जबाबदारी तहसीलदार, औसा, जिल्हा लातूर यांची राहील.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. काझी अनुसईद लियाकत अली, कादरी नगर, औसा, तालुका औसा, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, औसा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औसा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संजय वैजनाथ बावगे, : अपिलार्थी
बावगे निवास, पोचम्मा गल्ली, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१८६१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संजय वैजनाथ बावगे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, लातूर | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५-०४-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०७-०६-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०-०६-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१-०७-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत याची गंभीर दखल आयोग घेत आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २५-०४-२०११ च्या मूळ अर्जान्वये त्यांच्या स्वतःच्या जमिनीबाबत माहिती मागितली आहे ती त्यांना अद्यापपर्यंत मिळालेली नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, लातूर यांनी दिनांक १३-०९-२०११ रोजीच्या पत्रान्वये लातूर येथे दिनांक १३-०९-२०११ ते १६-०९-

२०११ या कालावधीत केंद्रीय मंत्री, विज्ञान तंत्रज्ञान यांचा दौरा असल्याने पुढील तारीख देण्याची विनंती केली आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहतील असे जिल्हाधिकारी, लातूर यांना पहावे लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय वैजनाथ बावगे, बावगे निवास, पोचम्मा गल्ली, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

जिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. दत्तात्रय विठ्ठलरेड्डी मरे,<br>व्दारा, गंगा राईस सेंटर, राधो कॉम्प्लेक्स, औराद (शा.), तालुका निलंगा, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>कासार शिरसी पोलीस स्टेशन, कासारशिरसी,<br>तालुका निलंगा, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी,<br>कासार शिरसी पोलीस स्टेशन, कासारशिरसी,<br>तालुका निलंगा, जिल्हा लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१८८१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक पोलीस निरीक्षक, कासार शिरसी पोलीस स्टेशन, कासारशिरसी, तालुका निलगां, जिल्हा लातूर<br>- श्री. व्ही. जी. तिडके | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१-०२-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २९-०४-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०७-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये त्रयस्थ श्री. व्यंकट नागरेड्डी मरे यांची सन १९८४ सालाची बी. आर. ओ. भरती बोर्ड पुणे येथे भरतीकरिता पाठविलेली कागदपत्रे,ओळखपत्राचा आर्मी नंबर इत्यादीची माहिती मागितली आहे.अपिलार्थी यांच्या दिनांक १९-०७-२०११ च्या व्दितीय अपिलामध्ये त्रयस्थाची मागणी केलेली माहिती उघड केल्याने कोणते व्यापक जनहित साध्य होणार आहे याबाबत कोणताही ऊहापोह केलेला दिसून येत नाही. यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (ङ)(त्र) नुसार ती देय होणार नाही असे आयोगाचे मत आहे.या सर्व बाबी विचारात घेता अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्तात्रय विठ्ठलरेड्डी मरे, व्दारा, गंगा राईस सेंटर, राधो कॉम्प्लेक्स, औराद (शा.), तालुका निलंगा, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस निरीक्षक, कासार शिरसी पोलीस स्टेशन, कासारशिरसी, तालुका निलगां, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मरे मल्लेश पांडुरंग,<br>व्दारा, सरपंच मेंनुभाई,<br>मु. पो. कलमुगळी, तालुका निलंगा, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१८८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर डॉ. - दिपाली घाडगे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१-०२-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २३-०३-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३-०४-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १६-०५-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०७-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २१-०२-२०११ च्या माहिती अर्जान्वये त्रयस्थ श्री. व्यंकट नागरेड्डी मरे यांची सन १९८४ साली मध्ये बी. आर. ओ. भरती बोर्ड पुणे येथे भरतीकरिता आवश्यक असलेल्या पाठविलेली कागदपत्रे,ओळखपत्राचा आर्मी नंबर इत्यादीची माहिती मागितली आहे. सदरची माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार देय होत नाही म्हणून देता येत नाही असे अपिलार्थीस दिनांक २२-०३-२०११ रोजी कळविले आहे. त्यांनी पुढे असेही अवगत केले की, जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांनी अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक १६-०५-२०११ रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती वीस वर्षापूर्वीची आहे याकरिता ती देय होत नाही. तथापि या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता जन माहिती अधिकारी तसेच पोलीस निरीक्षक, जि. वि. शा. यांनी सदर अभिलेखाचा शोध घेण्याचा प्रयत्न करावा. या प्रकरणी जुनी अभिलेखे पाच वर्षानंतर नष्ट केली जातात या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस माहिती देता येत नाही.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहेत. अपिलार्थी यांच्या मूळ माहितीच्या अर्जामध्ये ते त्रयस्थांची माहिती मागत आहेत. सदरची माहिती उघड केल्याने व्यापक जनहित कसे साध्य होईल ही बाब अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये नमूद केल्याचे दिसून येत नाही. यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (ङ)(त्र) नुसार ती देय होणार नाही असे आयोगाचे मत आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०९-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मरे मल्लेश पांडुरंग, व्दारा, सरपंच मेंनुभाई, मु. पो. कलमुगळी, तालुका निलंगा, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अंकुश बापुराव आंबेकर, | : | अपिलार्थी |
| | रा. कोळपा, पो. कासारखेडा, तालुका जिल्हा लातूर | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, लातूर | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर | | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३१५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : | उपस्थित |
| | अव्वल कारकून, उप विभागीय अधिकारी कार्यालय, लातूर - श्री. कांबळे एल. एस. | | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
| | उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, लातूर | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७-०८-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १४-११-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०-११-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०१-२००९ |

फेरसादर दिनांक १०-०८२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक ०७-०८-२००८ च्या माहिती अर्जान्वये मौजे कोळपा येथील गट नंबर १३४ मधून बेघरांना जमीन संपादन करण्याबाबत-च्या संपूर्ण संचिकेची प्रत मागितली आहे. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लातूर यांनी अपिलार्थीस दिनांक ०४-०९-२००८ च्या पत्रान्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिलेली आहे व काही माहिती तहसीलदार, लातूर यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती देण्याबाबत कळविले आहे. तथापि अपिलार्थी यांनी अपूर्ण माहिती मिळाली म्हणून प्रथम अपील सादर केले. यावर जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर यांनी सुनावणी घेतली व त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. त्यावेळी त्यांना उप विभागीय अधिकारी, लातूर यांच्याकडून संपूर्ण माहिती मिळाली अशी नोंद घेण्यात आली आहे व तहसीलदार, लातूर यांनी तात्काळ माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय घेण्यात आला आहे. तहसीलदार, लातूर यांनी राज्य माहिती आयोग खंडपीठास दिनांक १३-०९-२०११ रोजी लिहिलेले पत्र आयोगासमोर आहे. त्यात त्यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थीस दिनांक ०८-१०-२००८ रोजी माहिती देण्यात आली आहे. तथापि दिनांक २०-११-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्यात यावी असा निर्णय घेतला आहे. यावर तहसीलदार, लातूर यांनी माहिती दिली किंवा कसे याबाबत संभ्रम आहे. याकरिता तहसीलदार, लातूर यांना परत एकदा अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जातील मुद्दयांशी संबंधित व त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपिलार्थीस विनामूल्य पाठवावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. तहसीलदार, लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अंकुश बापुराव आंबेकर, रा. कोळपा, पो. कासारखेडा, तालुका जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, उप विभागीय अधिकारी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. देविदास रामराव गायकवाड, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअधीक्षक अभियंता,
बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ, परळी (वै.)जि.बीड
जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ, परळी (वै.) जि.बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८७० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. देविदास रामराव गायकवाड | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअधीक्षक अभियंता,बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ, परळी (वै.)जि.बीड - श्री. भा. पं. चाटे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे मंडळ, परळी (वै.), जि.बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०३.२०११ (फेरसादर दि. ०५.०८.२०११) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १३.०१.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमत: सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे मंडळ, परळी (वै.), जि.बीड यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे मंडळ, परळी (वै.), जि.बीड यांनी अपिलार्थीच्या दि. १३.०१.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देविदास रामराव गायकवाड,'श्री मावूली', दत्त मंदिराच्या मागे, जुना औसा रोड,ड्रायव्हर कॉलनी, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक अभियंता,बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ, परळी (वै.)जि.बीड  यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे मंडळ, परळी (वै.), जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गणेश दगडू होळे, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अति.सचिव,
कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव,
उच्चतम कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११५८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अतिरिक्त सचिव,कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर- श्री. दिलीप केशवराव सोनवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सचिव,कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर - श्री. समृत जनार्धनराव जाधव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६.०४.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. २२.०३.२०१० रोजीच्या मूळ अर्जान्वये कृषि उत्पन्न बाजार समितीमधील कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबीवर तसेच त्रयस्थ श्री. भास्कर शिंदे यांच्या सेवेसंदर्भात विस्तृत माहिती एकूण २१ मुद्यांद्वारे मागितली आहे. माहितीचा कालावधी सन १९८९ ते २१.०३.२०१० असा विस्तृत आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा आढावा घेऊन ती माहिती संकलीत करुन अपिलार्थीस ₹४३,२७६/- इतक्या शुल्काचा भरणा करावा, असे दि. १६.०४.२०१० रोजी अधिनियमातील कलम ७(१) मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत कळविले आहे. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेण्यात आली, त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन दि. ०६.०५.२०१० रोजी निर्णय देण्यात आलेला आहे की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीच्या शुल्काचा भरणा करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती घेण्यात यावी. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार आहेत. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही.

आज अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७(३) नुसार विहित मुदतीत आवश्यक शुल्काचा भरणा करण्याकरिता कळविण्यात आले आहे. या बाबीची जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीच्यावेळी सुध्दा नोंद घेण्यात आली आहे. तरीसुध्दा अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणेश दगडू होळे,रा. सुळ गल्ली, खडक हनुमान, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त सचिव,कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गणेश दगडू होळे, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अति.सचिव,
कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव,
उच्चतम कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११५९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अतिरिक्त सचिव,कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर-श्री. दिलीप केशवराव सोनवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर - श्री. समृत जनार्धनराव जाधव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १९.०४.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. २५.०३.२०१० रोजीच्या मूळ अर्जान्वये कृषि उत्पन्न बाजार समितीमधील मुख्य बाजार आवारात बसविलेल्या सी.एफ.एल. पथदिव्यासंदर्भात एकूण ७ मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी दि. ०७.१०.२००८ ते ३०.०३.२००९ असा आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा आढावा घेऊन माहिती संकलीत करुन अपिलार्थीस प्रतिपृष्ठ ₹२/- प्रमाणे शुल्क ₹२०/- मात्रचा कार्यालयात रोख भरणा करावा, असे दि. १९.०४.२०१० रोजी अधिनियमातील कलम ७(१) मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत कळविले आहे. यावर अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २४.०५.२०१० रोजी निर्णय देण्यात आलेला आहे की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीच्या शुल्काचा भरणा करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती घेण्यात यावी. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार आहेत. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थी यांनी कृषि उत्पन्न बाजार समितीकडे अनेक अर्ज केल्याचे दिसून येत आहे. प्रत्येक अर्जासंदर्भात त्यांना शुल्क भरणेबाबत कळविण्यात आले आहे. त्यावर प्रतिसाद दिलेला दिसून येत नाही.

आज अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७(३) नुसार विहित मुदतीत आवश्यक शुल्काचा भरणा करण्याकरिता कळविण्यात आले आहे. या बाबीची जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीच्यावेळी सुध्दा नोंद घेण्यात आली आहे. तरीसुध्दा अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणेश दगडू होळे,रा. सुळ गल्ली, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त सचिव,कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गणेश दगडू होळे, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अति.सचिव,
कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव,
उच्चतम कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११६० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अतिरिक्त सचिव,कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर-श्री. दिलीप केशवराव सोनवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सचिव,कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर - श्री. समृत जनार्धनराव जाधव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १९.०४.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. २५.०३.२०१० रोजीच्या मूळ अर्जान्वये कृषि उत्पन्न बाजार समितीमधील कार्यालयातील तळमजल्यावरील चेंबर, ॲन्टी चेबरचे विद्युतीकरणाच्या कामाबाबत एकूण ७ मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी दि.०१.०८.२००८ ते ०१.०२.२००९ असा आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या आढावा घेऊन माहिती संकलीत करुन अपिलार्थीस प्रतिपृष्ठ ₹२/- प्रमाणे₹३४/- इतक्या शुल्काचा भरणा करावा, असे दि. १९.०४.२०१० रोजी कळविले आहे. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २४.०५.२०१० रोजी निर्णय देण्यात आलेला आहे की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीच्या शुल्काचा भरणा करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती घेण्यात यावी. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार आहेत. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थी यांनी कृषि उत्पन्न बाजार समितीकडे अनेक अर्ज केल्याचे दिसून येत आहे. प्रत्येक अर्जासंदर्भात त्यांना शुल्क भरणेबाबत कळविण्यात आले आहे. त्यावर प्रतिसाद दिलेला दिसून येत नाही.

आज अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७(३) नुसार विहित मुदतीत आवश्यक शुल्काचा भरणा करण्याकरिता कळविण्यात आले आहे. या बाबीची जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीच्यावेळी सुध्दा नोंद घेण्यात आली आहे. तरीसुध्दा अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणेश दगडू होळे,रा. सुळ गल्ली, खडक हनुमान मंदिर,लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त सचिव,कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बागबंदे बस्वराज लिंगप्पा, : अपिलार्थी
रा.उदगीर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उदगीर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,निलंगा,जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१७३२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बागबंदे बस्वराज लिंगप्पा | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उप विभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उदगीर, जि.लातूर -प्रतिनिधी-श्री. आर.एस.पवार, व.लि. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा,जि.लातूर- श्री. सं.गो.मुनगिलवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०३.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १९.०४.२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३.०५.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१.०७.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०७.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. २५.०३.२०११ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये दि. ०१.०४.२००८ ते १५ मार्च, २०११ या तीन वर्षांच्या कालावधीची उदगीर उपविभागाअंतर्गत येणाऱ्या सर्व विकास कामाच्या करण्यात आलेल्या  बी १, ए १ निविदेबाबतची विस्तृत माहिती मागितली आहे. ही माहिती मोघम स्वरुपाची आहे. तसेच माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे माहिती संकलीत करणे चालू आहे व ती आपणास पुरविण्यास काही कालावधी लागेल, असे उपविभागीय अभियंता यांनी दि. १९.०४.२०११ रोजीच्या पत्राद्वारे विहित मुदतीत कळविले आहे. अपिलार्थी यांना दि. ०१.०८.२०११ रोजीच्या पत्राद्वारे एकूण चार मुद्यांवरील(३६ पृष्ठे) माहिती जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता यांनी दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांना सदरची माहिती मिळाली आहे. तथापि त्यांना सदरहू कामाच्या ठेकेदारांची नावे अशी माहिती हवी आहे, असे त्यांनी सुनावणीच्या वेळी अवगत केले.  सन  २००८ ते २०११ या कालावधीमध्ये उदगीर उपविभागामध्ये झालेल्या सर्व कामाबाबतच्या बी १ व ए १ झालेल्या कामांच्या ठेकेदाराची नावे त्यांच्या कार्यालयातील संबंधीत Resisters मध्ये उपलब्ध आहेत, त्यांची छायांकीत प्रत अपिलार्थीस देण्यात यावी, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थी यांनी भविष्यात माहिती मागताना मोघम स्वरुपात माहिती मागण्याऐवजी नेमकी माहिती मागावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे ठेकेदाराची नावे त्यांच्या कार्यालयातील ज्या नोंदवहीत समाविष्ट असतील, त्याच्या छायाप्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बागबंदे बस्वराज लिंगप्पा, रा.बसवनकेरी गल्ली,उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बागबंदे बस्वराज लिंगप्पा, : अपिलार्थी
रा.उदगीर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उदगीर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,निलंगा,जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१७४३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बागबंदे बस्वराज लिंगप्पा | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उदगीर, जि.लातूर-प्रतिनिधी - श्री. आर. एस. पवार, वरिष्ठ लिपीक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, जिल्हा लातूर - श्री. सं.गो. मुनगिलवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०३.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१.०४.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१.०७.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०७.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे उदगीर येथील किल्ल्यासमोर उभारण्यात आलेल्या प्रवेशद्वाराबाबत एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितली आहे. उदगीर उपविभागाअंतर्गत झालेल्या सदरच्या कमानीच्या कामातील अपिलार्थी यांनी मागितलेल्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविण्याची व्यवस्था करण्यात यावी, असे आयोगाचे निर्देश आहेत.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १४-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बागबंदे बस्वराज लिंगप्पा, रा.बसवनकेरी गल्ली,उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. महादेव सोमनाथ स्वामी, : अपिलार्थी
रा.अहमदपूर, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्रबंधक,
महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई.
जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव,
महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१७७७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२.११.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १२.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०३.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०१.२०११ (मुंबई कार्यालयाकडे प्राप्त) १५.०७.२०११ (औरंगाबाद कार्यालयाकडे फेरसादर) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महादेव सोमनाथ स्वामी,घर क्र.एन-२८,महादेव गल्ली, अहमदपूर,जि.लातूर-४१३५१५.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक,महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, ९, हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनस (व्हीटी) समोर, मुंबई-४००००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक,महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, ९, हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनस (व्हीटी) समोर, मुंबई-४००००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सचिन नामदेव शिंदे,<br>रा.लातूर. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी .मर्या.,ओ व एम डिव्हीजन, लातूर.<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी .मर्या.,लातूर | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१८८८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक अभियंता, महावितरण, विभागीय कार्यालय,लातूर - श्री. अशोक रामचंद्रराव येरमाळकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या.,लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८.०३.२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०३.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०७.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महावितरण विभागीय कार्यालय,लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात सन २००५ पासून त्यांनी केलेल्या कामाच्या मोबदल्यापोटी देण्यात आलेल्या पावत्या मागत आहेत. अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात सन २००८ पासून कार्यरत आहेत. माहितीचा शोध घेऊन ती एकत्रित करुन वेळोवेळी दि.१६.०३.२०११, २५.०३.०११,३०.०४.२०११ व तदनंतर दि. ०७.०५.२०११ रोजी अपिलार्थीस देण्यात आली आहे. उर्वरित माहितीचा शोध घेऊनही ती माहिती उपलब्ध झालेली नाही त्यामुळे उपलब्ध झालेली सर्व माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे, असे संबंधित विभागाने दि. ०७.०७.२०११ रोजी अपिलीय अधिकाऱ्यास कळविले आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन ही बाब दिसून येत आहे व उपलब्ध झालेली जास्तीत जास्त माहिती अपिलार्थीस देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महावितरण विभागीय कार्यालय,लातूर यांनी केल्याचे दिसून येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सचिन नामदेव शिंदे, द्वारा राजकुमार राचट्टे, मजगेनगर, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महावितरण विभागीय कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महावितरण विभागीय कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अजित तुकाराम माने, : अपिलार्थी
रा.आनसरवाडा, ता.निलंगा, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग निलंगा, जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१९१२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,निलंगा,जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,निलंगा,जि.लातूर- श्री. एस.जी.मुनगिलवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०३.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२.०३.२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३.०५.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१.०७.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०७.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, जि.लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. १३.०७.२००९ ते २८.०२.२०११ या कालावधीमध्ये वर्ष २००९-२०१० मधील वैधानिक विकास मंडळाकडून विकास कामासाठी प्राप्त झालेल्या निधीतून झालेल्या कामाबाबतची माहिती मागितली आहे. माहिती मागताना प्रश्नार्थक स्वरुप दर्शविण्यात आले आहे. तथापि माहिती विस्तृत स्वरुपात असल्यामुळे दि. १५.०४.२०११ रोजीच्या पत्रान्वये दि. २०.०४.२०११ रोजी कार्यालयाच्या प्रकल्प शाखेत उपस्थित राहून माहितीची पाहणी करावी व आवश्यक वाटते ती नमूद करावी म्हणजे त्याच्या प्रती देण्यात येतील, असे कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी यावर प्रतिसाद दिलेला नाही.

आज सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नाही, असे नमूद केलेले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अधिनियमातील कलम ७(१) नुसार पाहणीसाठी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावर अपिलार्थींनी प्रतिसाद दिलेला नाही, असे आढळून येत आहे. याकरिता जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती सशुल्क द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती सशुल्क द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अजित तुकाराम माने, मु.पो.अनसरवाडा,ता.निलंगा,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,निलंगा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,निलंगा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सोनकांबळे मल्लारी, कांबळे चंद्रकांत, अतुल गवळे, : अपिलार्थी
रा. अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
आगार प्रमुख,
म.रा.परिवहन महामंडळ, अहमदपूर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
विभाग नियंत्रक,
म.रा.परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१९२५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.सोनकांबळे मल्लारी | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.०४.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.०६.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.०७.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.०७.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांनी दि. २६.०४.२०११ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये अहमदपुर येथील बसस्थानकात उभारण्यात आलेल्या पाणपोईसाठी एकूण किती खर्च झाला याची विस्तृत स्वरुपात माहिती व

त्यासाठी घेतलेल्या सर्व साहित्य खरेदीच्या पावत्यांच्या झेरॉक्स प्रती मागितल्या आहेत. त्यांना ही माहिती प्राप्त झाली आहे. परंतु त्यामध्ये साहित्य खरेदीच्या पावत्या दिलेल्या नाहीत. एकच पावती रु.१५,५००/- ची देण्यात आली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली आहे. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. दि. १९.०७.२०११ रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जाची व जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीची तपासणी केली असता अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत आहे व अपिलार्थीस या पावतीची छायांकित प्रत पुन्हा देण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती प्रथम दि. २१.०५.२०११ रोजी प्रत्यक्षात दिलेली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांना दि. २१.०५.२०११ रोजी देण्यात आलेल्या माहितीमध्ये ₹१५,५००/- कट्टयाचे बांधकाम,नळ कनेक्शन तसेच टाईल्स बसवणे, शेड फिटींग व रंगरंगोटी या सर्व कामासह इतर खर्च व मजूरी इ.साठी झालेल्या एकत्रित खर्चाची रोख पावती देण्यात आलेली आहे. यामध्ये बांधकामाच्या तपशीलाचा समावेश असल्याचे दिसून येत आहे. या बाबी उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत आहेत.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सोनकांबळे मल्हारी, श्री. कांबळे चंद्रकांत व श्री. अतुल गवळे,रा.समतानगर, कोर्टाच्या पाठीमागे, अहमदपूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारीवर्ग अधिकारी,म.रा. परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,म.रा. परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.